सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ११ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## .....तर ते भोंगे जप्त करणार; मशिदीवरील भोंग्याबाबत देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

मशिदीवरील भोंगे आणि त्यातून परिसरातील लोकांना होणारा त्रास यावरून विधानसभेत भाजपा आमदार देवयानी फरांदे यांनी लक्षवेधी मांडली. या लक्षवेधीला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. राज्यात कुठल्याही प्रार्थना स्थळावर भोंगे लावण्याची परवानगी पोलिसांकडून घ्यावी लागेल. जर नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांना कारवाई करण्यात येईल. नियमांची अंमलबजावणी होतेय की नाही याची जबाबदारी पोलीस निरीक्षकावर निश्चित केली जाईल. जर पोलीस निरीक्षकाने याकडे दुर्लक्ष केले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

विधानसभेत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कुठल्याही प्रार्थना स्थळावर जे भोंगे आहेत त्याची परवानगी घेतली पाहिजे, हे भोंगे रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत बंद असले पाहिजेत. सकाळी ६ ते रात्री १० या काळात सकाळी ५५ डेसिबल आणि रात्री ४५ डेसिबल आवाजाची मर्यादा आहे त्यापेक्षा जास्त नको असे काही निर्देश कोर्टाने दिले आहेत. त्याबाबत कायद्यानुसार, जर अधिक डेसिबलने एखादा भोंगा वाजत




असेल तर त्यावर कारवाईचे अधिकार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला केंद्राने दिले आहेत. पोलिसांनी पुढाकार घेऊन चझउइ कळवायचं आहे, त्यानंतर त्या बोर्डाने पुढची कार्यवाही जे काही आरोपपत्र, कोर्टात खटला भरायचा अशी सध्या कायद्याची परिस्थिती आहे. ज्याप्रकारे या गोष्टीचा अवलंब व्हायला हवा तसा होत नाही हे खरे आहे अशी कबुली त्यांनी दिली.

तसेच यापुढे कुणालाही सरसकट भोंग्याची परवानगी देण्यात येणार नाही. जी परवानगी मिळेल ती निश्चित कालावधीसाठीच देण्यात येईल. या कालावधीनंतर पुन्हा भोंगा लावायचा असेल तर त्याची परवानगी पोलिसांकडून घेतली पाहिजे. ज्याठिकाणी ५५ डेसिबल, ४५ डेसिबल आवाजाच्या मर्यादेचं उल्लंघन होईल तिथे पुन्हा परवानगी देण्यात येणार नाही. जे काही भोंगे असतील त्यांची जप्ती केली जाईल. याबाबत तंतोतंत पालन होतंय की नाही याची जबाबदारी पोलीस निरीक्षकाची असेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**...तर पोलीस निरीक्षकावर कारवाई होणार**

याबाबत सगळी कारवाई केंद्रानं ठरवल्यानुसार चझउइ ला करायची आहे. त्यामुळे सध्या जे नियम आहेत त्यात बदल करणे गरजेचे आहे. जर हे नियम बदलले तर अधिक प्रभावीपणे यावर कारवाई करता येईल. यावर केंद्र सरकारला विनंती करण्यात येईल. आम्ही जे बदल यात सूचवत आहोत ते केंद्राने करून द्यावेत. जेणेकरून त्या बदल्यांच्या अनुरूप भोंग्याबाबत अत्यंत कडक कारवाई करता येईल. यापुढे भोंग्याबाबत समस्येची जबाबदारी पोलीस निरीक्षकाची असेल तर त्यांनी नाही केले तर कारवाई केली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केले.

## राज्य सरकारने 'आनंदाचा शिधा योजना' केली बंद?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. काल अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडला. दरम्यान, आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. राज्य सरकारने मागील वर्षी सुरु केलेली आनंदाचा शिधा ही योजना बंद केल्याची माहिती समोर आली आहे. ही योजना एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते त्यावेळी सुरू करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून सणाच्या दिवशी १ कोटी ६३ लाख लोकांना लाभ मिळत होता.

या आनंदाच्या शिधाच्या माध्यमातून रेशन कार्ड धारकांना एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चना डाळ आणि एक लिटर पामतेल मिळत होते. दरम्यान, आता ही योजना बंद करण्यात आल्यामुळे रेशनकार्ड धारकांना मोठा फटका




बसणार आहे.

अर्थमंत्री अजित पवार यांनी काल मांडलेल्या अर्थसंकल्पामध्ये आनंदाचा शिधा या योजनेबाबत कोणतीही तरतूद केली नसल्याचे दिसत आहे. या योजनेच्या माध्यमातून प्रत्येकवर्षी दिवाळी, दसरा, गुढीपाडवा अशा सणांना आनंदाचा शिधा देण्यात येत होता.

## एकदा दोनदा नाही तर ६ वेळा वाल्मीक कराडने मागितली खंडणी, दोषारोप पत्रातून धक्कादायक माहिती उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११बीड**

एकदा दोनदा नाही तर ६ वेळा वाल्मीक कराडने मागितली खंडणी, दोषारोप पत्रातून धक्कादायक माहिती उघडबीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अडकलेल्या वाल्मीक कराडच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. वाल्मीक कराडला संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्या प्रकरणी अटक केली आहे. याप्रकरणात दररोज धक्कादायक खुलासे होत आहेत. अशामध्ये वाल्मीक कराडने आवादा कंपनीकडे एक- दोन वेळा नाही तर तब्बल सहा वेळा खंडणी मागितल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दोषारोप पत्रात कंपनीच्या प्रकल्पाधिकाऱ्यांच्या जबाबातून ही माहिती समोर आली आहे.

संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी तुरुंगात असलेल्या वाल्मीक कराडबाबत आणखी एक धक्कादायक माहिती उघड झाली आहे. वाल्मीक कराडने आवादा कंपनीकडे एक किंवा दोन वेळा नाही तर तब्बल सहा वेळा खंडणी मागितल्याचे समोर आले आहे. आवादा कंपनीचे प्रकल्प अधिकारी सुनील शिंदे यांच्या जबाबात त्याचा उल्लेख आहे. तसेच, सुदर्शन घुलेने संतोष देशमुख यांना तुला बघून घेईल, जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली होती.



पहिल्यांदा खंडणी वाल्मिक कराडने फोनवरून २८/८/२०२४ रोजी मागितली होती. 'तुम्ही परळीत येवून भेटा नाही तर काम बंद करा.', असे वाल्मिक कराड म्हणाला होता.

दुसऱ्यांदा खंडणीसाठी वाल्मीक कराडने ११/०९/२०२४ रोजी फोन केला होता. यावेळी 'तुमचे बीड जिल्ह्यात कुठे कुठे काम चालू आहे. याची मला माहिती आहे. तुमच्या वरिष्ठांना माझ्याकडे घेऊन या.', असे वाल्मिक कराडने सांगितले होते.

तिसऱ्यांदा वाल्मीक कराडने ०८/१०/२०२४ रोजी खंडणी मागितली होती. परळी येथे वाल्मीक कराड विष्णू चाटे आणि माझे सहकारी शिवाजी थोपटे यांची परळीतील जगमित्र कार्यालयात भेट झाली होती. 'प्लांट सुरू ठेवायचा असेल तर दोन कोटी रुपये द्या. नाहीतर जिल्ह्यात कुठेही प्लांट सुरू ठेवू देणार नाही.' अशी धमकी दिली होती.

चौथ्यांदा खंडणी २६/११/२०२४ रोजी मागण्यात आली होती. सुदर्शन घुलेने कंपनीत येऊन 'वाल्मीक अण्णांनी सांगितलेले दोन कोटी रुपये दिले नाही तर बीड जिल्ह्यात कुठेही काम करू देणार नाही.', अशी धमकी दिली होती.

पाचव्यांदा खंडणी २९/११/२०२४ रोजी मागण्यात आली होती. विष्णू चाटेला ११:३० च्या सुमारास कॉल केला. त्यावेळी वाल्मीक अण्णा बोलणार आहेत. वाल्मीक कराड म्हणाले, 'अरे ते काम बंद करा चालू ठेवलं तर वातावरण गढूळ होऊन बसलं. ज्या परिस्थितीत सुदर्शनला सांगितले आहे. त्या परिस्थितीत काम बंद करा आणि तुम्ही पण तिथून निघून जा काम चालू कराल तर याद राखा.', अशी धमकी दिली होती. २९ /११/२०२४ रोजी दुपारी १ वाजता सुदर्शन घुले मसाजोग येथे कंपनी ऑफिसमध्ये आला होता. वाल्मीक अण्णांनी ठेवलेली डिमांड तुम्ही लवकर पूर्ण करा. अण्णा आज केजमध्ये येणार आहेत. त्यावेळी त्यांची भेट घ्या. असे धमकावून तो ऑफिसमधून निघून गेला.


सहाव्यांदा खंडणी ०६/१२/२०२४ रोजी मागण्यात आली होती. सुदर्शन घुले कंपनी ऑफिसमध्ये आला. सुरक्षारक्षकाला शिव्यागाळ करून मारहाण केली. थोपटे यांना २ कोटी रुपये खंडणी द्या नाहीतर कंपनी बंद करा धमकी दिली. यावेळी संतोष देशमुख यांनी कंपनी बंद करू नका असे येऊन सांगितले त्यावेळी 'तुला बघून घेतो. तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली होती.' असं शिवाजी थोपटे यांनी सुनील शिंदे यांना सांगितलं होतं.

## भाजपचा ठाकरेंना पुन्हा धक्का! कोकणातील प्रमुख नेते कमळ हाती घेणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

विधानसभा निवडणुकीतील दारूण पराभवानंतर ठाकरेंच्या शिवसेनाला धक्क्यावर धक्के बसत आहेत. महत्त्वाचे शिलेदार ठाकरेंची साथ सोडून महायुतीमध्ये सामील होत आहे. ठाकरेंना सर्वाधिक हादरे कोकणात बसत आहेत. राजन साळवी यांनी ठाकरेंची साथ सोडत शिंदे गटात प्रवेश केला होता. आता ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात भाजप ठाकरे गटाला धक्का देण्याच्या तयारीत आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटातील प्रमुख नेते ठाकरेंची साथ सोडून भाजपात प्रवेश करणार आहेत. त्यामुळे ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसणार आहे.आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या



पार्श्वभूमीवर प्रत्येक नेत्यांनी कंबर कसली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील प्रत्येक नेता मैदानात उतरला आहे. कुठे फोडाफोडीचं राजकारण, तर कुठे स्वेच्छेने नेते पक्षप्रवेश करत आहेत. नुकतंच माजी आमदार राजन साळवी यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडत शिंदे गटात प्रवेश केला होता.राजन साळवी यांनी साथ सोडल्यानंतर मालवणमध्ये ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसणार आहे. ठाकरे गटातील प्रमुख नेते भाजपच्या पक्षप्रवेशाच्या दिशेनं निघाले आहेत. माजी नगरसेवक मंदार केणी, माजी बांधकाम सभापती यतिन खोत, कुडाळ–मालवण विधानसभा मतदारसंघ प्रमुख शिल्पा खोत, माजी नगरसेविका दर्शना कासवकर, समाजसेवक भाई कासवकर भाजपात प्रवेश करणार आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतील भाजप कार्यालयात हा प्रवेश होणार आहे.

## होलिका दहनाचा मुहूर्त यंदा रात्री उशिराचा, नेमकं कारण काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अकोला**

होळी हा रंग, प्रेम आणि वसंत ऋतूत साजरा केला जाणारा महत्त्वाचा हिंदू सण. होलिका दहन हा एक विधी असून जो वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवितो. दरवर्षी होलिका दहन सायंकाळच्या सुमारास केले. यंदा मात्र होलिका दहनाचा मुहूर्त रात्री उशिरा राहणार आहे. त्याचे कारण ही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हिंदू महिन्याच्या फाल्गुनच्या पौर्णिमेच्या दिवशी होलिका दहन केले जाते. सणाला धार्मिक महत्त्व तर असतेच, पण शास्त्रीय महत्त्व देखील आहे. होळी दहन मनुष्याला आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाणे आगीत जाळून राख करावी, या गोष्टीचे प्रतीक आहे. होळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहर कोतवाली चौकातील श्री बालाजी मंदिरात अकोला पुरोहित संघांची सभा घेण्यात आली. यात महाराष्ट्रीयन पंचांग, वल्लभ मणिराम, सम्राट, निर्णय सागर, मुहूर्त चिंतामणी आदी पंचांचे प्रमुख आधार घेऊन होलिका दहनचा मुहूर्त निश्चित करण्यात आला.



त्यानुसार यावर्षी होलिका दहन यंदा रात्री ११.२६ नंतर असल्याचे सांगण्यात आले आहे. यंदा १३ मार्च रोजी होळी, तर १४ मार्च रोजी धूलिवंदन आहे. गुरुवार १३ मार्च सकाळी १०.५ पासून भद्रा लागते. ही रात्री ११.२६ पर्यंत राहणार आहे. यानंतरच होलिका दहन करावे, असे शास्त्रात मत आहे. भद्राचे महत्व होलिका पर्वाला फार आहे. पूजन, प्रदक्षिणा, साखरगाठ्याचे हार, भस्म लावणे आदी प्रकारे होलिका पूजन करण्यात येते.शहरामध्ये मोठ्या उत्साहात होळी साजरी करण्यात येते. अकोल्यात १०० वर मोठ्या होळी तर घरोघरी होलिका दहन करण्यात येते. होलिका दहनासाठी मुहूर्त बघितला जातो. सर्वसाधारणतः सायंकाळचा हा मुहुर्त असतो. मात्र, यंदा रात्री ११ वाजून २६ मिनिटानंतरचा मुहूर्त शुभ असल्याचे पुरोहित संघाकडून सांगण्यात आले आहे.

**हार व पुजेची तयारी अगोदरच**

१३ मार्च रोजी सकाळी १०.३५ वाजण्यापूर्वी हार व पुजेची तयारीचे कार्य संपन्न करावे लागणार आहे. वेगवेगळ्या भागात अनेक प्रकारे होलिका दहन करण्यात येते. काही ठिकाणी भ्रदामध्येही होलिका दहन करतात, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या सभेत पंडित रजनीकांत जाडा, रतन तिवारी, आलोक शर्मा, श्याम अवस्थी, प्रमोद तिवारी, अशोक शर्मा, हरीश उपाध्याय, सुरेश शिवाल, लाला तिवारी, सचिन शर्मा व पंडित रवी कुमार शर्मा आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## चिखलीत कडकडीत बंद! धनंजय मुंडे यांच्यावरही गुन्हे दाखल करण्याची मागणी, संतोष देशमुख हत्याकांड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११बुलढाणा**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येच्या निषेधार्थ चिखली शहरात आज कडकडीत बंद पाळण्यात आला. या निर्घृण घटनेच्या निषेधार्थ चिखलीतील सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी आणि सर्वसामान्य नागरिक एकवटल्याचे दिसून आले.

आज मंगळवारी, अकरा मार्च रोजी पुकारण्यात



आलेल्या बंदलालहान मोठे व्यापारी, सामाजिक संघटना उत्स्फूर्त पाठबळ दिल्याने कडकडीत बंद पाळण्यात आल्याचे दिसून आले. मुख्य मार्गावरीलच नव्हे तर अंतर्गत मार्गावरील आणि परिसरातील दुकानें बंद होती.शांततेत आणि एकजुटीने नागरिकांनी या आंदोलनात सहभाग नोंदवला. शहरातील सर्व दुकाने, बाजारपेठा, औद्योगिक प्रतिष्ठाने, आणि वाहतूक संपूर्णतः बंद होती. व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवत आंदोलनाला पाठिंबा दिला. बंद शांततेत पार पडला.पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

या आंदोलनाच्या माध्यमातून चिखलीतील नागरिकांनी शासनाकडे दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. स्व. संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहत आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी नागरिकांनी आपली एकजूट दाखविली आज सकाळी चिखली बसस्थानक परिसरात मोठ्या संख्येने नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय नेते एकत्र आले. या वेळी स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी चिखली तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात विविध मागण्याचा समावेश आहे.

## 'मॉर्निंग वॉक' नर्सच्या जीवावर बेतला, 'ट्रॅक्टर काळ बनून आला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अकोला**

जीवनात काळ, वेळ सांगून येत नसते. कधी काय होईल, हयाचा काहीच अंदाज लावता येत नाही.अकोल्यात नर्स असलेली एक महिला आज, मंगळवारी सकाळी 'मॉर्निंग वॉक'साठी गेली होती. घरी परत येत असताना ट्रॅक्टर काळा बनवून आला आणि त्या महिलेचा जीव घेऊन



गेल्याची धक्कादायक घटना आज सकाळी गीता नगर येथील हिंगणा मार्गावर घडली. तूर घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरची ट्रॉली रस्त्यावरून पादचारी जाणाऱ्या महिलेच्या अंगावर उलटली. त्याखाली दबून महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्रतिभा किर्डे असे मृतक महिलेचे नाव आहे. भरधाव वाहतुकीमुळे आता रस्त्यावर 'मॉर्निंग वॉक'ला जाणे देखील धोकादायक ठरत आहे.

पहाटे चालणे हा दिवसाची सुरुवात करण्याचा उत्तम मार्ग. यामुळे दिवसाची सुरुवात चांगली होण्यासोबतच योग्य जीवनशैली राखली जावू शकते. निरोगी वजन राखण्यासाठी आणि एकूणच तंदुरुस्ती सुधारण्यासाठी 'मॉर्निंग वॉक' एक उत्तम मार्ग आहे. शहरातील आरोग्य विषयक जागरूक नागरिक सकाळच्या सुमारास आपल्याला विविध मार्गांवर 'मॉर्निंग वॉक' करताना दिसून येतात. वर्दळीच्या व भरधाव वाहतूक होणाऱ्या रस्त्यावरील 'मॉर्निंग वॉक' आता जीवघेणा ठरत आहे.

## संपादकीय ......

# बिहारमध्ये हिंदुत्व, राष्ट्रवादावर भाजपचा भर

बिहारमध्ये लवकरच विधानसभा निवडणुका होणार आहेत आणि या निवडणुकीत भाजपने जातीय राजकारणाच्या जोखडातून बिहारला बाहेर काढण्याच्या उद्देशाने आपली रणनीती राबवली आहे. भाजपने या रणनीतीला हिंदुत्व, अध्यात्म आणि राष्ट्रवादाचा तडका दिला आहे. ज्याप्रमाणे हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्ली यासारख्या राज्यांत भाजपने ऐतिहासिक विजय मिळवला होता, त्याचप्रमाणे आता भाजपने बिहारमध्येही याच तंत्राचा वापर करण्याचे ठरवले असून त्याचा फायदा पक्षाला होण्याची शक्यता आहे.

बिहारच्या राजकारणात हिंदुत्व, अध्यात्म आणि राष्ट्रवादाची हाक देत भाजपने निवडणूक मोहीम सुरू केली आहे. यासाठी बाबा बागेश्वर, श्री श्री रविशंकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत या तीन नेत्यांकडे या मोहिमेची धुरा सोपवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बिहार दौर्याने या मोहिमेची सुरुवात झाली. त्यानंतर या तीन प्रमुख धार्मिक आणि विचारधारक नेत्यांच्या दौर्यांनी जातीय राजकारणावर धर्म आणि राष्ट्रवादाचे महत्त्व वाढवले आहे. विरोधक हा भाजपच्या निवडणूक रणनीतीचा भाग मानत आहेत, तर भाजप आणि संघ हे सामाजिक आणि सांस्कृतिक जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याचे मानत आहेत; पण यामुळे बिहारमध्ये हिंदुत्व आणि जातीय राजकारणातील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता अधिक आहे. या त्रिमूर्तीतील पहिला दौरा बाबा बागेश्वर (धीरेंद्र कृष्ण शास्त्री) यांनी गोपालगंजमध्ये केला आहे. हा भाग पारंपरिकपणे राष्ट्रीय जनता दलाचा (राजद) बालेकिल्ला मानला जातो. माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्या प्रभावाखाली असलेल्या या भागात बाबा बागेश्वर यांच्या प्रवचनांमध्ये हिंदुत्व आणि सनातन संस्कृतीवर भर दिला गेला आहे. जातीय समीकरणे बिहारमध्ये नेहमीच महत्त्वपूर्ण ठरली आहेत. यादव, कुर्मी, कोइरी, भूमिहार, ब्राह्मण, दलित आणि मुस्लीम या विविध समुदायांच्या राजकीय एकत्रीकरणामुळे राजकारण आकार घेत आहे. हिंदुत्वाचा मुद्दा या जातीय समीकरणांना कमजोर करू शकला, तर भाजपला याचा मोठा फायदा होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे. बाबा बागेश्वर यांचे धार्मिक सत्संग हे महत्त्वपूर्ण मानले जात आहे. कारण, हिंदुत्वाच्या नावाखाली बिहारींना एकत्रित आणण्याचा हा प्रयत्न मानला जात आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास केवळ बिहारच नाही, तर अन्य राज्यांतील निवडणूक रणनीतीसाठी तो फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे. भाजपचा दुसरा महत्त्वपूर्ण म्हणून गुरू रविशंकर यांचा दौरा मानला जात आहे. त्यांनी बिहारमध्ये सत्संग आणि योगा सत्र घेतले आहे. यामध्ये त्यांनी एक प्राचीन शिवलिंगही आणले, ज्याचा संबंध महमूद गजनीच्या इतिहासाशी जोडला जात आहे. यामुळे हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरणाच्या मुद्द्यावर चर्चा होऊ शकते. अशा सांस्कृतिक प्रतीकांचा वापर भाजपच्या निवडणूक रणनीतीसाठी प्रभावी ठरू शकतो.

रविशंकर यांचे सत्संग आणि शिवलिंगांचा वापर मतदारांच्या भावनांवर प्रभाव टाकू शकतो की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. इतकेच नाही की, याचा प्रभाव बिहारच्या राजकारणावर कसा होतो, हेसुद्धा पाहणे रंजक ठरेल. बिहारच्या राजकारणात तिसरी आणि सर्वात महत्त्वाची भूमिका संघप्रमुख मोहन भागवत यांनी घेतली आहे. ते बिहारमध्ये पाच दिवसांच्या दौर्यावर आहेत. संघाच्या सक्रियतेमुळे भाजपला विविध राज्यांमध्ये फायदे मिळाले आहेत. संघाच्या स्वयंसेवकांनी लोकांशी संवाद साधून हिंदुत्वाशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा सुरू केली आहे. संघाची ही जुनी रणनीती आहे. संघाने बिहारमध्ये 'मिशन त्रिशूल' सुरू केले आहे. यामध्ये पहिल्यांदा नाराज मतदारांची ओळख पटवली जाईल आणि त्यानंतर प्रभावी निवडणूक मुद्दे आणि भाजपसाठी फायदेशीर मुद्दे शोधले जाणार आहेत. हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्ली विधानसभा निवडणुकीत फायदा झाल्याने भाजपकडून ही रणनीती अवलंबली जात आहे. संघाच्या स्वयंसेवकांना स्थानिक शाखा विस्तारणे आणि अधिकाधिक मतदारांनी संवाद साधून त्यांचे मुद्दे समजून घेण्याचे काम दिले आहे. संघ ही कोणतीही राजकीय संस्था नाही, तरीही त्याच्या स्वयंसेवकांच्या बैठका लोकांच्या मुद्द्यांवर केंद्रित होत असतात. प्रत्येक गल्ली, मोहल्ल्यात आणि गावात संघाचे स्वयंसेवक लोकांना जागरूक करण्याचे काम करत आहेत आणि त्यांना एक प्रभावी आणि जबाबदार सरकार निवडण्यासाठी प्रेरित करत आहेत. भाजपच्या या सर्व रणनीतीमुळे विरोधक चिंतेत पडले आहेत. भाजपच्या या रणनीतीमुळे सहकारी पक्ष जदयूदेखील अस्वस्थ आहे. भाजप मतदारांशी संवाद साधत असून पक्षाच्या या आक्रमकतेचा फायदा होईल, असे सांगितले जात आहे.

# श्रीश्याम बाबांच्या निशान शोभायात्रेने धामणगाव दुमदुमले

## ठिकठिकाणी यात्रेचे उस्फुर्त स्वागत

### लाकडी रथावर विराजमान श्री श्यामबाबांच्या दर्शनाला भक्तांची गर्दी
### धामणगावच्या श्रीबालाजी खाटुश्याम मंदीरात रंगरंगीला फाल्गुन यात्रा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११धा.रेल्वे,**

येथील श्रीबालाजी खाटुश्याम मंदीरात रंगरंगीला फाल्गुन यात्रेला सुरूवात झाली असून सोमवारला (ता.१०) शहरात श्रीश्याम बाबांची भव्य ध्वज ( निशान) शोभायात्रा काढण्यात आली.यात्रेत मोठ्या संख्येने श्रीश्याम भक्त सहभागी झाले होते.या ध्वज यात्रेने शहर दुमदुमले.

येथील जे. बी. पार्क येथील श्री बालाजी-खाटू श्याम मंदिरात गेल्या २० वर्षांपासून फाल्गुन महिन्यातील एकादशीच्या पावन पर्वावर हा रंगरंगीला फाल्गुन मेळा आयोजित केला जातो. फाल्गुन शुक्ल पक्ष नवमी ते फाल्गुन शुक्ल त्रयोदशीपर्यंत चालणाऱ्या या विशाल मेळ्यात दररोज श्री श्यामबाबांची मुर्ती रंगीबेरंगी फुलांनी सुशोभित केली जाते. संध्याकाळी श्री श्यामबाबांची पवित्र ज्योत प्रज्वलित केली जाते आणि भव्य भजन संध्या आयोजित केली जाते.



दरम्यान सोमवारला (ता.१०) सकाळी ९ वाजता, हाताने चालवल्या जाणाऱ्या लाकडी रथावर विराजमान असलेल्या श्री श्यामबाबांच्या मूर्तीची भव्य निशान यात्रा जे.बी. जिन येथून सुरू होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करीत श्री बालाजी-खाटू श्याम मंदिरात पोहोचली. या यात्रेत महाकाल झांझ पथक, भजन दिंडी, तसेच पारंपरिक राजस्थानी वेशभूषेत महिला व पुरुष श्री श्यामबाबांच्या ध्वजा (निशान) हाती घेऊन सहभागी झाले होते. या यात्रेच्या स्वागतासाठी विविध ठिकाणी ज्योत पूजन व जलपान व्यवस्था केली केली होती.हिंगणघाट, वर्धा, आर्वी, पुलगाव, देवळी, अमरावती, यवतमाळ, चांदूर रेल्वे येथून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी आले होते.'कीर्तन की है रात' या भजन संध्येत छत्तीसगड, राज्यातील राजनांदगावच्या सुप्रसिद्ध गायिका राधिका शर्मा आपल्या मधुर आवाजाने भक्तांना भक्तीरसात चिंब केले. त्यानंतर रात्री १० वाजता छप्पन भोग अर्पण व महाआरती झाली.

# भुईमूग पिकावरील खोडकुज, मुळकुज रोगाचे असे करा व्यवस्थापन




**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक**

जानेवारी महिन्यात विदर्भात उन्हाळी हंगामात भुईमूग पिकाची लागवड करण्यात आली आहे. सध्या या पिकावर जमिनीत उद्धवणाऱ्या खोडकुज/मुळकुज या रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

या रोगाचे नियंत्रण भुईमूग पीक ६०-७० दिवसांचे असेपर्यंत करणे आवश्यक असल्याचे आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

ज्या शेतकऱ्यांनी बुरशीनाशकाची प्रक्रिया करून पेरणी केलेली आहे त्यांच्या पिकामध्ये प्रादुर्भाव कमी आहे.

रोगग्रस्त झाडाची प्रमुख लक्षणे

पीक रोपावस्थेत असताना जमिनीलगत काळ्या रंगाची बुरशीची वाढ आढळून येते आणि रोप कोलमडून पडते. जमिनीलगत खोडावर पांढऱ्या रंगाची बुरशी आढळून येते, पाने पिवळसर होऊन कालांतराने झाड मलूल होऊन वाळते.

अशी करा उपाययोजना

रोगट झाडांचे प्रमाण २५-३० टक्क्यांपर्यंत आढळून आल्यास कार्बेन्डाझीम किंवा व्हिटाव्हॅक्स २५ ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून पिकामध्ये ज्या भागात प्रादुर्भाव दिसून येतो त्या ठिकाणी व सभोवताली जमिनीमध्ये ओतावे/ड्रेनचिंग करावे

किंवा रोगाचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात असल्यास जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा २.५ किलो प्रती २५ किलो शेणखतात मिसळून प्रती हेक्टरी जमिनीत पुरेसा ओलावा असताना रोपांच्या खोडाशी/मुळाशी द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


सध्या या पिकावर जमिनीत उद्धवणाऱ्या खोडकुज/मुळकुज या रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. या रोगाच्या दीर्घकालीन प्रभावी नियंत्रणासाठी जमिनीत पिकांची फेरपालट करताना मका, ज्वारी व बाजरी यासारख्या तृणधान्य पिकांचा अंतर्भाव करायला हवा.

**– संतोष गहूकर,** तेलबिया संशोधन केंद्र, पीडीकेव्ही.












## रमजान महिन्यात 'रोजे' ठेवताना अशी घ्या आरोग्याची काळजी

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

संपूर्ण भारतभर रविवारपासून (दि.२) चंद्रदर्शनानंतर रमजानला प्रारंभ होत आहे. रमजान महिना मुस्लिम धर्मियांसाठी पवित्र असून, या महिन्यात उपवास (रोजे) ठेवण्याची प्रथा आहे. दिवसभर अन्न आणि पाणी न घेता उपवास केला जातो. रमजानमध्ये उपवास ठेवणे म्हणजे शरीर आणि आत्म्याचा शुद्धीकरणाचा काळ असतो. योग्य आहार, पुरेशी झोप आणि शरीर हायड्रेट ठेवणे आवश्यक आहे. आरोग्याची काळजी घेतल्यास रविवारपासून (दि.१) सुरू होणारे रोजे (उपवास) सहज आणि ऊर्जा देणारा ठरेल. चला जाणून घेऊया या काळात आरोग्याची कशी काळजी घ्यावी याविषयी ...



**सेहरीमध्ये पोषक आहार घ्या**–रोजे सुरू करण्याआधी पहाटे सेहरीमध्ये संतुलित आणि पोषणयुक्त आहार घेणे महत्त्वाचे आहे. आहारात प्रथिने, तंतुमय पदार्थ आणि हळूहळू ऊर्जा मिळणारे कार्बोहायड्रेट्स असावेत. संपूर्ण आहार असलेले पदार्थ (जसे की ओट्स, गहू, ब्राऊन राईस) घेतल्याने पचन प्रक्रिया सुधारते. दुधजन्य पदार्थ, अंडी, डाळी यांचा समावेश केल्यास शरीराला आवश्यक प्रथिने मिळतात. उपवास सुरु होण्यापूर्वी भरपूर पाणी आणि ताक घेतल्यास दिवसभर पाण्याची कमतरता जाणवत नाही.

**दिवसभर हायड्रेटेड राहा**– दिवसभर पाणी पिणे शक्य नसल्याने शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी सेहरी आणि इफ्तारवेळी भरपूर पाणी प्या. साखर नसलेले फळांचे रस, ताक, लिंबूपाणी यांचा समावेश आहारात करा. उष्ण तापमान आणि कडक ऊन असल्यास जास्त वेळ घराबाहेर जाऊ नका. त्यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणार नाही, ते टिकून राहील.

**इफ्तारमध्ये अति खाणे टाळा**– सायंकाळी उपवास सोडताना (इफ्तार) हलक्या पदार्थांनी सुरुवात करा. खजूर आणि पाणी हे पारंपरिक आणि आरोग्यदायी पर्याय आहेत. तेलकट आणि तळलेले पदार्थ टाळा, कारण हे पदार्थ पचनाला त्रासदायक ठरू शकतात. भाज्या, फळे, आणि प्रथिनयुक्त पदार्थ खाल्ल्यास शरीराला आवश्यक पोषण मिळते.

**झोप आणि व्यायामाचे नियोजन करा**

रमजानमध्ये उपवास करत असताना शरीराला पुरेशी विश्रांती मिळणे गरजेचे आहे. रात्री उशिरा झोपून लगेच सकाळी उठल्याने थकवा जाणवू शकतो, म्हणून शक्य तितकी विश्रांती घ्या. सौम्य व्यायाम (जसे की चालणे ) इफ्तारनंतर करा.

**मधुमेह आणि इतर आजार असलेल्या व्यक्तींनी काळजी घ्या**– मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा इतर गंभीर आजार असलेल्या व्यक्तींनी रोजे ठेवण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. औषधे घेण्याची वेळ आणि प्रमाण योग्य ठेवा. शुगर किंवा रक्तदाब खूप कमी झाल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**मानसिक आणि शारीरिक संतुलन राखा**

रमजानमध्ये केवळ उपवास नव्हे, तर मानसिक शांतीही महत्त्वाची आहे. सकारात्मकता आणि संयम ठेवा. ध्यान आणि प्रार्थना केल्याने मानसिक आरोग्य सुधारते. नैराश्य किंवा अस्वस्थता जाणवत असल्यास कुटूंब आणि मित्रांशी संवाद साधा.

# ॲड. धर्मपाल मेश्राम यांची महानगरपालिकेला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

मा.ॲड. धर्मपाल मेश्राम उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी अमरावती महानगरपालिकेला भेट दिली. मा.ॲड. धर्मपाल मेश्राम उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी अमरावती महानगरपालिकेला भेट दिल्याबद्दल त्यांचा यावेळी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून स्वागत व सत्कार केला.

अमरावती महानगरपालिकेत मा.ॲड. धर्मपाल मेश्राम उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. यात अनुसूचित जाती-जमातीच्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती, भरती अनुशेष सेवा ज्येष्ठतेनुसार सरळ भरतीचे अनुशेष, अवैध पदोन्नती आणि अनुसूचित जाती-जमातीच्या योजनांचा किती कर्मचारी आणि महानगरपालिका क्षेत्रातील लोकांना लाभ मिळतो, या विषयांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत मा.ॲड.



धर्मपाल मेश्राम उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी महानगरपालिकेतील विविध विभागांच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. सदर विभागांच्या अधिका-यांशी चर्चा करुन कामकाजाबाबत माहिती घेवून त्यांना निर्देशित करण्यात आले.

हॉस्पीटलची वर्गवारी करण्याच्या सुचनाही यावेळी त्यांनी दिल्या. संपुर्ण हॉस्पीटलची फायर तपासणी बाबत माहिती जाणुन घेतली. अनधिकृत मोबाईल टॉवर बाबत माहिती जाणून घेवून त्याबाबत मार्गदर्शन केले. होर्डींग्ज बाबत सद्याची स्थिती जाणून घेवून त्यावर त्वरीत उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. लाड पागे समितीनुसार केलेल्या संपुर्ण कार्यवाहीचे पाहणी यावेळी त्यांनी केली.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, शहर अभियंता ईश्वरानंद पनपालिया, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, दिपीका गायकवाड, धनंजय शिंदे, सुभाष जानोरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, विधी अधिकारी श्रीकांतसिंह चव्हाण, मालमत्ता अधिकारी दिपक खडेकार, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, उपअभियंता नितीन बोबडे, जयंत काळमेघ, राजेश आगरकर, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ११ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# सर्वसामान्यांना न्याय देण्यात समाधान मिळते 'मिट द प्रेस' मध्ये

## विशाल आनंद यांनी व्यक्त केल्या भावना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती** – कॉलमपोलीस दलात काम करीत असताना दर दिवशी नविन कामासोबत नवी आव्हाने आहेत, आणि त्या आव्हानांचा सामना करुन अनेकदा आपण सर्वसामान्यांसाठी काही तरी करु शकलो, त्याला समाधान देवू शकलो, याचे आत्मिक समाधान मिळते, असे पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने आयोजित 'मीट द प्रेस'मध्ये माध्यम प्रतिनिधींसोबत संवाद साधतांना सांगितले.ते म्हणाले, अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात, संपूर्ण देशातच पोलीस ठाणे व मनुष्यबळाची कमतरता आहे. मात्र आहे त्या मनुष्यबळात अधिक चांगले काम करणे गरजेचे आहे, तोच आमचा प्रयत्न असतो. दरम्यान अमरावती जिल्ह्यात आणखी पाच ते सहा पोलीस ठाणे गरजेचे आहे. इतर भागाच्या तुलनेत मेळघाटातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता त्या भागात तरी पोलीस ठाण्यांची संख्या वाढणे आवश्यक आहे, त्यासाठी आमचे प्रयत्नसुध्दा सुरूअसल्याचे एसपी विशाल आंनद म्हणाले.यावेळी विशाल आनंद सिंगुरी यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. श्रीलीना सिंगुरी उपस्थित होत्या. डॉ. श्रीलीना या येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालयात कार्यरत आहेत. एसपी विशाल आनंद यांच्यासोबतच डॉ. श्रीलीना यांनीही पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिलीत. सुरूवातीला एसपी विशाल आनंद यांनी त्यांची कौटूंबिक व शैक्षणिकपार्श्वभूमी सांगितली. हैद्राबाद येथील मूळ रहिवासी




विशाल आनंद यांचे आई, वडील दोघेही शासकिय कर्मचारी होते. घरात यापूर्वी कोणीही बड्या नोकरीवर नव्हते. बारावीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर आयआयटीमधून अभियांत्रिकीची पदवी घेतली. त्यानंतर स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली आणि २०१३ मध्ये युपीएससी परीक्षा उत्तीर्ण करुन आयपीएस झाले. आई, वडिलांनी शिक्षणासाठीकधीही कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होवू दिली नाही. मात्र आयुष्यात स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे राहू शकू, असे काम कर, हे करत असतानाच आपण समाजालाही काहीतरी देवू शकलो पाहिजे, त्यासाठी प्रयत्न कर असे वडिलांनी सांगितले. त्यामुळेच कदाचित आयआयटीमधून बाहेर आल्यावर फुगलेल्या पॅकेजची नोकरी न करता या दिशेने आलो. आज आयआयटी मधील काही मित्रांचे कॉल येतात, आर्थीकदृष्ट्या ते माझ्यापेक्षाही भक्कम आहेत. मात्र त्यांचे दरदिवशीचे काम ठरलेले आहे.माझे मात्र दरदिवशी नविन काम आहे. नवी आव्हाने आहेत, आणि त्या आव्हानांचा सामना करुन अनेकदा आपण सर्वसामान्यासाठी काही तरी करु शकलो, त्यांना समाधान देवू शकलो, असे आत्मिक समाधान मिळते, असेही एसपी विशाल आनंद यांनी सांगितले. याचवेळी डॉ. श्रीलीना यांनी सांगितले की, मी सुध्दा सर्वसामान्य घरातूनच आले आहे. लग्नापूर्वी एमएबीबीएस पूर्ण केले होते. त्यानंतर आमचे 'अरेंज मॅरेज' झाले.लग्नापूर्वीच एसपी साहेबांनी मी कुटूंबाला शक्य तेवढा अधिक वेळ देण्याचा प्रयत्न करेल, मात्र माझे पहिले प्राधान्य नोकरीला राहणार असेही स्पष्टपणे सांगितले होते. ते आजही आम्हाला (कुटूंबाला) भरपूर वेळ देतात, मात्र काम आल्यास कामाला प्राधान्य देतात, त्यामुळे ते वेळ देत नाहीत, अशी अजिबात तक्रार नसल्याचे त्यांनी सांगितले.

# चिखलदऱ्यातील सैनिक स्कूलच्या विद्यार्थ्याला बेदम मारहाण

## इयत्ता अकराव्या वर्गातील कॅप्टन विद्यार्थ्यांकडून शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती**

विदर्भाचे नंदनवन असलेले चिखलदरा येथील दीपशिखा गुरुकुल सैनिक स्कूल येथील एका वरिष्ठ विद्यार्थ्याने कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्याला काठीने बेदम मारहाण केल्याची माहिती समोर आली आहे. पीडित विद्यार्थ्यांचे पालक शाळेत पोहोचल्यानंतर शाब्दिक वाद झाला. त्यानंतर शाळेत रॅगिंगचा तर प्रकार सुरू नाही ना, अशी चर्चा रंगली होती.इयत्ता अकराव्या वर्गातील आणि कॅप्टन म्हणून जबाबदारी असलेल्या विद्यार्थ्यांकडून इयत्ता सहाव्या वर्गात शिकणाऱ्या कनिष्ठ विद्यार्थ्याला काही कारणास्तव शिक्षा म्हणून काठीने मारहाण करण्यात आली. ही बाब शाळा प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्याला ग्रामीण रुग्णालय चिखलदरा येथे उपचारार्थ दाखल करून उपचार करून घेतले. मारहाण करणारा अकराव्या वर्गातील विद्यार्थी हा मध्यप्रदेश येथील बैतूलचा आहे.असून सहाव्या वर्गातील विद्यार्थी दर्यापूर येथील रहिवासी असल्याची माहिती आहे.

हा प्रकार रॅगिंगचा नसून नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षा म्हणून कॅप्टनद्वारे मारहाण झाल्याची कबुली शाळा प्रशासनाने दिली.



इयत्ता अकरावीचा विद्यार्थी आणि कॅप्टनची जबाबदारी सांभाळणाऱ्या एका विद्यार्थ्यांकडून सहाव्या वर्गातील विद्यार्थ्याला काठीने मारहाण केली, त्या विद्यार्थ्यावर चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचार करून घेण्यात आले. पीडित विद्यार्थ्यांचे पालक शाळेत आल्यानंतर मारहाण करणाऱ्या विद्यार्थ्याने दिलगिरी व्यक्त करून प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न झाला. कोणत्याही विद्यार्थ्याला दुसऱ्या विद्यार्थ्याकडून मारहाण करणे ही बाब अत्यंत चुकीची असून शाळा प्रशासनसुद्धा या विषयाला अनुसरून दिलगिरी व्यक्त करीत आहे. – **राजेंद्र चर्जन,** प्राचार्य, दीपशिखा गुरुकुल सैनिक स्कूल, चिखलदरा.

# अमरावतीकरांचा स्वप्नपूर्ती करणारा अर्थ संकल्प – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील बेलोरा विमानतळाचे काम बऱ्याच काळा पासून रखडत होते. परंतु गतिमान महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आता हे काम पूर्ण झाले असून ३१ मार्च पासून अमरावतीकरांना विमान प्रवासाची सेवा सुरू करण्याची घोषणा माननीय उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी सरकारच्या पहिल्या अर्थ संकल्पात केल्याने अमरावतीकरांची स्वप्नपूर्ती झाली असल्याचे प्रतिक्रिया पालकमंत्री चंद्रशेखर बावनकर यांनी व्यक्त केली..यासोबतच मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांनी रिद्धपूर येथे मराठी भाषेचे विद्यापीठ सुरू करण्याची घोषणा केली होती. या अर्थसंकल्पात मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर येथे मराठी भाषेचे संशोधन व अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संकलन केंद्र व अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची देखील तरतूद करण्यात आली. महानुभाव पंथाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रिद्धपूर येथील अनेक मंदिरांच्या विकासाची तरतूद देखील या अर्थसंकल्पात आहे.



याच प्रमाणे अमरावती जिल्ह्यातील खारपाण पट्टा असलेल्या दर्यापूर भागात विशेष प्रकल्प राबविला जाणार आहे. यामुळे, येथील जमीन खरपणा मुक्त होनार आहे. यामुळे येथील शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल होणार आहे. नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानासोबत नवीन पिकांसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जाईल. ज्यातून या भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.अमरावती जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने संपूर्ण अमरावती जिल्ह्याच्या वतीने मी मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदेजी व उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे या लोकाभिमुख अर्थसंकल्पासाठी अमरावती जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने मी मनःपूर्वक आभार मानतो असे मत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

# शहरातील ८० पोलिसांना रिवार्डएडीजी सुनील रामानंद यांनी दरबारात ऐकले कर्मचाऱ्यांचे प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती** – महाराष्ट्राचे अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांना सोमवारी सकाळी पोलीस कवायत मैदान येथे सलामी देण्यात आली. त्यानंतर सुनील रामानंद यांनी पूर्ण परेडची पाहणी करून ८० कर्मचाऱ्यांना रिवार्ड दिला. तसेच पोलीस सैनिक संमेलनामध्ये (दरबार) त्यांनी कर्मचारी व अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद रविवारी सायंकाळी अमरावती ला मुक्कामी होते. सोमवारी




सकाळी ते पोलीस आयुक्तालयात पोहचताच पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर कवायत मैदान येथे त्यांना सलामी देण्यात आली. यावेळी पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे आणि सागर पाटील यांच्या नेतृत्वात परेड घेण्यात आली होती. त्यानंतर पी.टी. मॉकड्रील, शस्त्र कवायत अशा प्रकारचे वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले. त्यानंतर स्वतः एडीजी यांनी पूर्ण परेडचे निरीक्षण केले आणि उत्कृष्ट परेड, देखणा पोषाख परिधान करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रिवार्ड दिला. त्यानंतर त्यांनी पूर्ण मुख्यालयाची पाहणी केली. यामध्ये गार्ड, बॅन्डपथक आणि शस्त्रसाठा ठेवलेल्या इमारतीची पाहणी केली. त्यानंतर कवायत मैदानात पोलीस सैनिक संमेलनात आयुक्तालयाती ल कर्मचारी, अधिकारी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकूण घेतल्या. यामध्ये इन्कम टॅक्स, कुटुंब नियोजन योजनेतील अडचणी असे अनेक प्रश्नांचा समावेश होता. यावेळी आयुक्तालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थीत होते.


# वैनगंगा–नळगंगाने हरित प्रदेशाची आस !अमरावती विभागात सिंचन समृद्धी होणारसहा जिल्ह्यातील १५ तालुक्यांना होणार लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** – राज्यातील बहुप्रतिक्षीत वैनगंगा 'नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे रखरखत्या परिसरात सिंचन संमृद्धीचा' नवा महामार्ग गवसणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. वैधानिक आणि प्रशासकीय मान्यतेपोटीतब्बल ८८ हजार ३७४ कोटींची मान्यता मिळाली होती. विशेष म्हणजे सोमवारला राज्य सरकारने सादर केलेल्या बजेटमध्ये सीएम फडणवीसांच्या महत्वाकांक्षी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पाला तत्वतः मान्यता दिली. त्यामुळे अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ या चार जिह्यात प्रस्तावित कालव्यांमधून हरितप्रदेश अस्तित्वात यावा, अशी आस शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून भंडारा जिल्ह्याच्या गोसेखुर्द प्रकल्पातील पाणी नदी जोड कालव्याद्वारे बुलढाणा जिल्ह्याच्या नळगंगा प्रकल्पात सोडले जाणार आहे.

### सहा जिल्ह्यात सिंचने लाभ

सुमारे ४२६.५२ किमी लांबीच्या या कालव्याच्या माध्यमातून विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा अशा सहा जिल्ह्यांत सिचन समृद्धी आणली जाणार आहे. या




पाण्याचा १५ तालुक्यांतील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्राला सिचनाचा लाभ होणार आहे. यासोबतच पिण्यासाठी आणि औद्योगिक वापरासाठीही हे पाणी उपयोगी ठरणार आहे. देशभरातील जवळपास १४६ जलाशयांची पाणीपातळी अनेकदा खालावते. या प्रकल्पावर अवलंबून असलेले शेतकरी आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. विदर्भाचा विचार करता ही समस्या अधिक गंभीर आहे. यातूनच शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वेढिले. ही समस्या सोडविण्यासाठी सिचन सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार समित्यांनी मांडला. याचा परिणाम म्हणून विदर्भात नदी जोड प्रकल्प राबविण्यात येणार आहे वैनगंगा नदीवर बांधलेल्या गोसेखुर्द 'प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा पूर्ण वापर या माध्यमातून केला जाईल. राज्य जल परिषदेच्या आठव्या बैठकीमध्ये मान्यता मिळाल्यानंतर या प्रकल्पाचा समावेश एकात्मिक राज्य जल आराखड्यात करण्यात आला होता.

### सिंचनाचा अनुशेष भरून निघेल

दुसऱ्या भागात ८७ हजार ३४२ कोटी ८६ लाख रुपयांची कामे केली जातील. यालाही तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून विदर्भातील सिचनाचा अनुशेष भरून निघेल. सोबतच शेतकरी आत्महत्याग्रस्त प्रदेशाचा डाग पुसून काढण्यासाठी मदत होईल, असा दावा केला जात आहे.

### दोन भागात प्रकल्प पूर्ण करणार

हा प्रकल्प दोन भागांत पूर्ण केला जाणार आहे. पहिल्या भागात प्रकल्पांतर्गत साठवणूक स्थळांचे सर्वेक्षण, मुख्य कालव्याला जोडणारे शाखा कालवे, फिडरकालवे आणि त्यावरील बांधकामांचे सर्वेक्षण, प्रकल्पासाठी आवश्यक सर्वमान्यता, वनजमिनीचेसंपादनयासारखी कामे केली जाणार आहेत. याकामासाठी १ हजार २३२ कोटी ६ लाख रुपयांच्या रकमेस प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे, हे विशेष.

# काँग्रेस पदाधीकारी कार्यकर्त्यांनी गाफील राहु नये, सामान्य नागरिकांपर्यंत पोहचण्याची गरज–बबलु देशमुख

## अंजनगाव सुर्जी येथे काग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न

**–विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अंजनगांवसुर्जी:** अंजनगाव सुर्जी येथे नुकतीच काँग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न झाली.जिल्हाकाग्रेसचे अध्यक्ष बबलु देशमुख खासदार बळवंत वानखडे व मान्यवरांनी आढावा घेत काग्रेसच्या पदाधीकारी व कार्यकर्त्यांना सुचनादे ऊन मार्गदर्शन केले.आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकांची रणनीती पक्षाची ध्येयधोरणे तळागाळात नेऊन जनतेच्या कामातून पक्ष वाढीसाठी व पक्ष संघटना मजबूत करणे,पक्षबांधनी, पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी काग्रेस पक्षाचेआढावा बैठक सपन्न झाली. यामध्ये तालुक्यातील व शहर पदाधिकारी कार्यकर्ते तालुक्यातील पदाधीकारी उपस्थित होते. यामध्ये प्रमुख उपस्थितीत खासदार बळवंत वानखडे, जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख,मा.आमदार विरेंद्र जगताप,मा.जि.प.सभापती



बाळासाहेब हिंगनकर, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रमोद दाळु,शहरअध्यक्ष प्रदीप देशमुख, अनंत साबळे,हेमंत येवले,आरुन चौखंडे, सुरेश आडे,सुधाकर खारोडे ,पंजाबरावजी सावरकर नरेंद्र पाटील निचळ धर्मराज बारब्दे,बबलू काळमेघ,अरविंद पखान,अमोलघुरडे ,किशोर खडसे,शोएब भाई, संजय सरोदे, इब्राहिम भाई ,विदर्भ कुमार बोबडे ,विनोद हाडोळे, अजय डिके, दीपक नवलकर, अमर शिंगणे, राहुल पाटील, रमेश सावळे, कैलास शिरसाट, श्रीकृष्ण इंगळे, सत्य विजय निपाणी, नाना पाटील, शिवरतन धोटे, सुभाष मुंडे, मनोज लव पंचांग, मनोज सुकळकर, पुरुषोत्तम ढोकणे, राहुल पाटील, दीपक नवलकर सपनाताई शिंगणे, बोबडेताई, बारब्दे ताई , बबन टोलमारे, सुधाकर तायडे, मिलिंद निचाळ, गोपाळराव मोरे, विनय मानकर, किशोर गावंडे, दिलीप देशमुख, विनंतीबाई तायडे, सागर गायगोले निखिल कोकाटे,संजय सरोदे, विदर्भाकुमार बोबडे, किस्मत अली,विनोद हाडोळे, इब्राहिम भाई,शोएब खान, गुणवंत राव सारकटे, नाझीम खतीब , शिवदास यावले, स्वराज वानखडे, मुश फिक अली ,प्रशांत कोल्हे, धीरज धुळे, अवेज खान, निलेश ढगे, नईम भाई, वसीम खान, गजानन आठवले, अनिल जुनगरे या सर्व सहकारी पदाधिकारी यांचे उपस्थितीत आढावा बैठक पार पडली होते. यावेळी खासदार बळवत वानखडे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला संघटना वाढीसाठी सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्नशील असावे जनतेच्या प्रश्नाकडे पक्षाच्या वतीने आंदोलन, मोर्चे इत्यादी कार्यक्रमे हातात घ्यावे. कार्यकर्त्यांनी तळागाळातील सामान्य माणसा पर्यंत पोहचने गरजेचे आहे सर्वसामान्य लोकांची कामे झाले पाहिजे आसे मार्गदर्शन केले.तर जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांनि लोकसभा व विधानसभेत ज्याप्रमाणे आपन एकदीलाने विजयीश्री खेचुन आनली,या वेळी गावंडगाव येथील पंधरा युवकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून प्रमोद पाटील दाळू यांच्या नेतृत्वात काम करण्याची इच्छा व्यक्त करत असंख्य कार्यकर्ते पदाधीकार्य़ांचे उपस्थितीत आढावा बैठक पार पडली यामुळे तालुक्यातील काँग्रेस पक्षात पुन्हा नवचैतन्य निर्माण झाले व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुका अध्यक्ष प्रमोद दाळू यांनी पुढील निवडणुकांमध्ये जनतेच्या आशीर्वादाने काँग्रेस पूर्णपणे यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही याची ग्वाही मान्यवरांना दिली.

# अकोल्यात विटीदांडू, रस्सीखेच, लगोरी, लंगडीसह पारंपरिक खेळांनी बहरले क्रीडांगण

## जिल्हा तसेच विभागीय स्तरावर अकोल्याचा 'आयटीआय'चा दबदबा

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.११अकोला–** महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय विभागाच्या अंतर्गत जुन्या पारंपारिक क्रीडा महाकुंभ जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अकोला येथे करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये अकोला जिल्हास्तरावर तसेच अमरावती येथे झालेल्या विभागीय स्तरावर अकोला येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थ्यांनी विविध स्पर्धा जिंकून आपले वर्चस्व राखले.

जिल्हास्तरीय स्पर्धांचे उद्घाटन संस्थेचे प्राचार्य सुनील घोंगडे यांनी केले. यावेळी प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी शरदचंद्र ठोकरे, सहदेव पोटदुखे तसेच सर्व गटनिदेशक प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.तर विभागीय स्तरावर अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांनी सहभाग घेतला.अकोला आयटीआयने विभागीय स्तरावर लेझीम,लंगडी आणि रस्सीखेच या तीन सांघिक स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावले तसेच संस्थेचा प्रशिक्षणार्थी प्रतीक चिकटे याने दंड बैठक या वैयक्तिक खेळामध्ये विभागीय स्तरावर विजेतेपद पटकाविले. तर सौरभ



गिरी हा प्रशिक्षणार्थी पंजा लढवणे या स्पर्धेमध्ये द्वितीय राहिला. सोबतच शासकीय आयटीआय (मुलींची) अकोला येथील महिलांच्या चमूने रस्सीखेच या सांघिक स्पर्धेमध्ये विजेतपद पटकावले. यानिमित्त झालेल्या स्पर्धांमध्ये लुप्त होत चाललेले पारंपरिक खेळ जसे लंगडी,लेझीम, लगोरी, विटी दांडू, पंजा लढवणे, रस्सीखेच, दोरीउड्या, पावनखिंड दौड यांनी मैदान पुन्हा गजबजून गेले व अत्यंत उत्साही वातावरणात चुरशीचे सामने झाले.

विभागीय स्तरावर प्रावीण्य पटकावणाऱ्या सर्व खेळाडूंचे प्राचार्य सुनील घोंगडे तसेच सर्व गटनिदेशक यांनी संस्थेत सत्कार सोहळा आयोजित करून अभिनंदन केले.स्पर्धांच्या यशस्वितेकरिता क्रीडा समन्वयक रमण जाधव, प्रवीण तराळे, जयेश तिरपुडे, रोहित डोंगरे, भूषण मेहसरे, चंद्रशेखर शेळके, विनोद पायघन, मंगेश पुंडकर आदींनी परिश्रम घेतले.

## ऊस, कांदाप्रश्नी सर्वपक्षीय नेते एकवटतात, मात्र सोयाबीनवर...

### आमदार रणधीर सावरकर यांची खंत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अकोला :** विदर्भातील सोयाबीन उत्पादकांच्या गहन प्रश्नावर भाजपचे विधिमंडळातील मुख्य प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांनी आक्रमक भूमिका घेतली. राज्यातील सोयाबीन उत्पादकांकडून केवळ ३० टक्के सोयाबीनची खरेदी झाली. त्यामुळे कोरडवाहू सोयाबीन उत्पादक शेतकरी अडचणीत आले असून यासंदर्भात सुस्पष्ट धोरण ठरवण्याची मागणी आमदार सावरकर यांनी सभागृहात केली. यावर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कांद्याच्या प्रश्नावर चर्चा सुरू असतांना विदर्भातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा गंभीर मुद्दा आमदार रणधीर सावरकर यांनी सभागृहात मांडला. सोयाबीनचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. ५० लाख टन सोयाबीनचे उत्पादन झाले. नाफेडमार्फत केवळ १५ लाख टन सोयाबीनची खरेदी केली. याविषयी शासन पुन्हा खरेदी सुरू करणार का? असा प्रश्न आ. सावरकर यांनी केला. विदर्भातील सोयाबीन उत्पादक कोरडवाहू शेतकरी अडचणीत आहे. कांदा आणि ऊसासारखे विदर्भातील सोयाबीनचे 'ब्रँडिंग' नाही. ऊस आणि कांद्याचा प्रश्न आला की सर्वपक्षीय नेते उभे राहतात. सोयाबीनवर फारसे कोणी बोलत नाही, अशी खंत देखील आमदार सावरकर यांनी व्यक्त केली.

रणधीर सावरकर यांनी आमदारांच्या समस्याकडे देखील सभागृहाचे लक्ष वेधले. अधिकाऱ्यांना फोन लावल्यावर त्यांना सोयाबीन खरेदी करणार का? त्याचा प्रस्ताव पाठवला का? असे प्रश्न विचारल्यावर ते आता आम्ही तूर खरेदी करणार, त्याच्याकडे लक्ष द्या, असे उत्तर देतात.

रवींद्र धंगेकरांनी शिवसेनेत प्रवेश करताच एकनाथ शिंदे म्हणाले

## आता कळेल हू इज धंगेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ पुणे**

पुण्यातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आमदार धंगेकर यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

२०२३ मध्ये कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात सध्याचे आमदार हेमंत रासने यांचा पराभव केला होता. त्यानंतर त्यांची राज्यभरात चर्चा झाली होती. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत धंगेकर यांना पराभव स्वीकारावा लागला होता. त्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आज धंगेकर यांच्या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, आता लोकांना कळेल हू इज धंगेकर? अशी मिश्किल टिप्पणी केली.



शिंदे यांच्या या टिप्पणीनंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, रवींद्र धंगेकर हे पुण्यातील लोकप्रिय लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी त्यांची ओळख कामाने निर्माण केली आहे. यांच्या पोटनिवडणुकीवेळी मी तिकडे होतो. ती निवडणूक गाजली पण, सगळी फौज लागली तरी धंगेकरांनी बाजी मारली आणि लोकसेवक काय असतो हे दाखवले. आता तुम्ही शिवसेनेत आला आहात, त्यामुळे लोकांना कळेल हू इज धंगेकर?

### शिवसेनेतून राजकीय कारकिर्दीला सुरुवात

दरम्यान रवींद्र धंगेकर यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात शिवसेपासून केली होती. १९९७ ते २००२ मध्ये त्यांच्या भगिणी वंदना धंगेकर आणि त्यानंतर २००२ ते २०२२ पर्यंत रवींद्र धंगेकर हे विविध पक्षांच्या तिकिटावर पुणे महानगरपालिकेमध्ये सलग चार वेळा नगरसेवक म्हणून निवडून गेले होते. २००२ मध्ये रवींद्र धंगेकर हे शिवसेनेच्या तिकीटावर पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले होते.


## मध्यरात्री 'समृद्धी' वर अकरा मजूर लघुशंकेसाठी वाहनातून उतरले अन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११बुलढाणा**

शीर्षक वाचून कोणीही दचकणे स्वाभाविक आहे. तसेच आता अपघातासाठी प्रसिद्ध हिंदु हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे समृद्धी दृतगती महामार्गावर भुताटकी चा खेळ पान सुरु झाला काय? अशी मजेदार शंका मनात येण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. पण तस काही नसून ही अपघाताचीच बातमी आहे बरं कारविवारी, नऊ मार्चला मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास चॅनेल क्रमांक ३३६.५ वर हा विचित्र अपघात घडला. यात लघु शंकेसाठी वाहनातून खाली उतरणे मजुराना महागात पडले. यात एक जण गंभीर जखमी झाला असून त्याचा पाय अक्षरशः पिरगाळला गेला आहे. इतरांना मुका मार लागला आहे.

**लघुशंकेला थांबणे पडले महागात–** टाटा ट्रक( एम एच २० जि झेड २८३०) चा चालक अमजद महमूद पठाण( वय ३२ वर्ष राहणार पारोळा तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर हा वाहनात लहान सिमेंट मिक्सर टाकून ११ मजूरासह घेऊन जात होता. दरम्यान मध्यरात्री मंजूर लघुशंकेसाठी वाहनातून उतरले



. याच वेळी अचानक मागील बाजूने भरधाव वेगाने आलेल्या ट्रक ( एम एच १५ एफव्हीओ ०९३७ )ने उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडक दिली.

यावेळी लघवी करीत असलेल्या मजुरांपैकी शोएब शाह (वय विस वर्ष राहणार छत्रपती संभाजी नगर) हा गंभीर जखमी झाला झाला असून त्याचा पाय पिरगाळला गेला. त्याला समृद्धी महामार्ग रुग्णवाहीका मधून डॉक्टर यासीन शहा व चालक प्रवीण राठोड यांनी दवाखान्यात पाठविले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस उप निरीक्षक उज्जैनकर व रात्रीच्या गस्त (पेट्रोलिंग ) वरील पोलीस यांनी अपघातग्रस्तांना मदत केली. गंभीर जखमी शोएब शहा याच्या पायाचा चुराडा झाल्याने त्यास संभाजीनगर येथे रवाना करण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीराजेंच्या क्रूर हत्त्येला आज ३३६ वर्ष पूर्णः राजे अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११नागपूर**

वढु तुळापूर येथे फाल्गुन वद्य अमावस्या ११ मार्च १६८९ रोजी क्रूर औरंगजेबाने संभाजी राजांची हत्या केली. त्या दुर्दैवी दिवसाला मंगळवारी ३३६ वर्ष पूर्ण होत आहे . इतक्या प्रदीर्घ काळानंतरही संभाजी नावाचे जबरदस्त आकर्षण समाजात असल्याचे अलीकडे प्रदर्शित झालेल्या छावा चित्रपटाने दाखवून दिले. मात्र आजही शंभूराजे न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार) आमदार व प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी व्यक्त केली आहे.



मिटकरी म्हणतात, शंभुराजांच्या जीवनचरित्राच्या समकालीन साधनांचा आधार घेत अभ्यास केला तर मराठा इतिहासात(छत्रपती शिवाजी महाराजांचा अपवाद वगळता) त्यांच्या इतका साहसी,पराक्रमी, स्वातंत्र्यप्रेमी,स्वाभिमानी व सुसंस्कृत असा दुसरा छत्रपती झाला नाही. राजनितीशास्त्र, शृंगारशास्त्र, अध्यात्मशास्त्र आदींमध्ये पारंगत असलेल्या या वयाच्या अवघ्या तेराव्यावर्षी संस्कृतमध्ये श्रीबुधभुषणम (राजनीतीपर),नखशिख व नायिकाभेद हे ब्रजभाशेतील (शृंगार शास्त्रपर), सातसतक (अध्यात्म शास्त्रापर) अशी ग्रंथरचना करून त्यांची सांस्कृतिक उंची व साहित्यातील योगदान स्वतःच अधोरेखीत केले. विद्वत्ते बरोबरच दुसरीकडे रणांगण गाजवताना सिद्दी, पोर्तुगीज,डच,इंग्रज व मुघलांशी एकाच वेळी अनेक आघाडयांवर विजयी झुंज देणारे ते अद्वितीय योद्धाही ठरले.

मराठी, हिब्रु, पाली, संस्कृत, इंग्रजी, ब्रजभाषेसह ते १७ भाषेचे जाणकार होते. कवी व तेज:पुंज शरीर संपदा मिळविलेले युवराजही होते. गोव्याचा व्हाईसरॉय ज्याचे सोबत १२०० गोरे, २५०० काळे शिपाई व ६ तोफा होत्या त्याला अवघ्या ६०० मराठ्यांनी फोंड्या किल्ल्यावरून पिटाळुन लावले, हे संभाजीराजांचे वेगळेपण होते! दिंडोरीतील रामसेज औरंगजेबाचा सरदार शहाबुद्दीन खानाविरुद्ध अनेक वर्ष मुठभर मावळ्यांनी लढवीला. शिवाय जंजिरा मोहीम, अकबराला राजाश्रय, दंडाराजपुरीवर चाल, भागानगरवर हल्ला, बुऱ्हाणपूर, कारंजा, जालना, औरंगाबाद, सुरत अशा असंख्य १४० लढाया लढून एकाही लढाईत पराभूत न होणारा विजयी योद्धा असा आपला छत्रपती, किती शुर आणि कर्तबगार असेल? वयाच्या ३२ व्या वर्षी ४० दिवस अन्नाचा कणही पोटात नसतांना सह्याद्रीचा हा छावा हाल सोसत स्वराज्य रक्षणासाठी समर्पित झाला.

शंभूराजांच्या हौतात्म्याला ३३६ वर्ष पूर्ण झालीत. मात्र अद्यापही त्यांच्या उज्वल जीवनचरित्रावर महाराष्ट्र शासनाने प्रकाश टाकला नाही. विधिमंडळ परिसर व मंत्रालयात त्यांचे तैलचित्र लावण्याचाही प्रयत्न झाला नाही. शासकीय मुद्रणालयात त्यांचे अधिकृत चित्र उपलब्ध नाही. यावेळी तरी महाराष्ट्र सरकारने त्यांच्या इतिहासाचा अभ्यास करून इतिहास संशोधकांच्या देखरेखित चरित्र साधन समिती गठित करावी ,अशी महाराष्ट्रातील मराठी मनाची जनभावना आहे. सोबतच बलिदान दिनी त्यांना अभिवादन करावे, त्यांचा इतिहास पाठ्यपुस्तकांमध्ये अंतर्भूत करावा. छावा अद्यापही न्यायाच्या प्रतीक्षेत झुंजत आहे.. चित्रपट बघून मनोरंजन होऊ शकेल मात्र देशातील या थोर छत्रपतींचा पराक्रम सानथोरांनी पाठ्यपुस्तकातून आत्मसात केला व सरकारने तसा तो अंत:र्भूत केला तरच हे सूयोग्य काम सरकार कडून घडेल छत्रपती संभाजी महाराज उपेक्षित राहू नयेत ही महाराष्ट्राची अपेक्षा आहे,असे मिटकरी यांनी नमूद केले आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

## शेफ विष्णू मनोहर यांचे चाहत्यांना आवाहन; म्हणाले, फेसबुकवरील माझ्या मास्टर रेसिपीवरच्या व्हिडिओला क्लिक करू नका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११नागपूर–** 'कृपा करुन माझ्या फेसबुकवरील 'मास्टर रेसिपी' या अकाउंटवरील व्हिडीओला 'क्लिक' करु नका.' प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून त्यांच्या चाहत्यांना आवाहन केले. यावेळी त्यांनी चाहत्यांना अक्षरश: हात जोडून विनंती केली आहे. प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांचे 'मास्टर रेसिपी' हे फेसबुक अकाऊंट हॅक करण्यात आले आहे. या हॅक केलेल्या अकाउंटच्या माध्यमातून दररोज अश्लिल व्हीडिओ पोस्ट केले जात आहेत. विष्णू मनोहर यांनी सायबर क्राईम विभागाकडे तसेच फेसबुक व्यवस्थापनाला यासंदर्भात तक्रार दाखल केली आहे. सोमवारी विष्णू मनोहर यांनी पत्रकार परिषद घेऊन या संदर्भात




प्रसार माध्यमांना ही माहिती दिली. मागील ३५ वर्षापासून पाककला क्षेत्रात विष्णू मनोहर कार्य करीत असून त्यांचे 'मास्टर रेसिपी' हे युट्यूब चॅनेल प्रसिद्ध आहे. विशेषकरुन त्यांच्या सबस्क्राईबर्स मध्ये महिलांची संख्या अधिक आहे. या चॅनेलवरून ते विविध मराठी पाककृतींचे व्हिडिओ पोस्ट करत असतात. याशिवाय, फेसबुकवर 'मास्टर रेसिपी' या चॅनेलचे पेज देखील असून त्याठिकाणी देखील ते रेसिपीचे व्हिडिओ पोस्ट केले जातात.विष्णू मनोहर म्हणाले, विविध पदार्थ तयार करण्याचे कौशल्य दर्शकांना आत्मसात करता यावे तसेच, मराठी खाद्य संस्कृती लोकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने आम्ही 'मास्टर रेसिपी' चॅनेल सुरू केले. मात्र, कुणीतरी माझे फेसबुक अकाऊंट हॅक केले असून त्याद्वारे अश्लिल व्हिडीओ पोस्ट करत आहे. यापूर्वीदेखील मेक्सिकोतून पेज हॅक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर हा प्रकार संपला. आताही मेक्सिको वरुनच हे पेज हॅक झाले

## पर्यटकांना अनुभवता येणार खाणीतला थरार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ नागपूर–** खनिज संपत्तीसाठी राज्यात अनेक ठिकाणी खाणी तयार करण्यात आल्या आहेत. या खाणीत काम करणारे कामगार दररोज स्वत:चा जीव धोक्यात घालूनच काम करत असतात. सुरक्षेत थोडीही गडबड झाली तरीही जीव गमवावा लागतो. अशा अनेक घटना घडल्या देखील आहेत. विदर्भात अलीकडेच खाणीतील कामगारांचा स्वत:चा जीव गमवावा लागला आहे. सर्वसामान्यांना या खाणींविषयी माहिती व्हावी म्हणून आता सर्वसामान्य नागरिकांना या खाणीचा थरार अनुभवता येणार आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक व भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून पर्यटकांना रोमांचकारी अनुभव देण्याकरिता 'खाण पर्यटन सहल' उपक्रम राबविण्यात येणार आहे. आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी ही सहल आयोजित करण्यात येणार असून यात कमीत कमी पाच तर जास्तीत जास्त १५ लोकांना सहभागी होता येईल. नागपूर शहराच्या जवळ कोलार नदीच्या काळावर खनिज संपत्तीने परिपूर्ण असलेल्या सावनेर तालुक्यातील वेकोलीच्या अंतर्गत असलेल्या जमिनीच्या खाली सुमारे दोनशे ते तीनशे मीटर खोल खाणींच्या आतील विश्व बघण्याचा थरारक अनुभव देणारी ही रोमांचकारी सहल राहणार आहे. वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेडने विकसीत केलेल्या कोळसा खाण परिसरातील इको पार्कमधील विविध झुले, सी शॉवर, ट्री हाऊस मचान, टॉय ट्रेन, फॉऊंटन वेटसह, मॉडेल माईन वर्कींग



मशीन, सोलर सिस्टीम इत्यादींचा आनंद घेता येणार आहे.

या खाण पर्यटन सहलीत सहभागी होण्यासाठी पर्यटकांचे वय १८ वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ सिव्हिल लाईन्स, कार्यालय, नागपूर ते सावनेर कोळसा खाण ते परत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, सिव्हिल लाईन्स, कार्यालय असा सहलीचा मार्ग राहणार असून एसी वाहन सुविधा राहील. प्रथम येणाऱ्या पर्यटकांना प्राधान्य दिल्या जाईल. सदर सहलीच्या माहितीकरिता व बुकींगकरिता सुनिल येताळकर, अधिकारी, भ्रमणध्वनी क्रमांक ९०२१५१५५१९, आशिष दखणे भ्रमणध्वनी क्रमांक, ९०९६०११८५० व वैशाली भांडारकर भ्रमणध्वनी क्रमांक ९५०३९६६८७७ यांच्याशी पर्यटकांनी संपर्क करावा व या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन दिनेश आ. कांबळे, वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, प्रादेशिक कार्यालय नागपूर, अमरावती यांनी केले आहे.

# सोयाबीन उत्पादकांना करोडोंचा फटका

## हमीभावापेक्षा १२०० रुपयांनी कमीने खरीदी, भावांतर योजना ठरली चुनावी जुमला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

सोयापेंड (डीओसी) ची मागणी घटल्याने देशांतर्गत सोयाबीनचे दर गडगडले आहेत. हमीभाव ४,८९२ रुपये असताना सोयाबीनला सध्या ३,८०० रुपये क्विंटल भाव मिळत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना करोडो रुपयांचा फटका बसला. अशा परिस्थितीत भावांतर योजनेचा लाभदेण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे.

यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पावसाने सोयाबीनचे नुकसान झाले. त्यामुळे सरासरी उत्पादनात कमी आली आहे. अशा स्थितीत मागणी वाढून दर वाढणार, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. प्रत्यक्षात हंगामापूर्वीच सोयाबीनचे दरात कमी आलेली आहे. यावर्षी केंद्र शासनाने ४,८९२ रुपये क्विंटल असा सोयाबीनचा हमीभाव जाहीर केलेला आहे. मात्र, सोयाबीनचे दर चार हजारांचे आत आहे. ७ मार्चला सोयाबीनला ३,७०० ते



**सोयाबीनचे बाजारभाव**

| | (रु/क्विं) |
|---|---|
| २४ फेब्रुवारी – | ३,७५० ते ३,९५१ |
| २८ फेब्रुवारी – | ३,८०० ते ३,९६१ |
| ३ मार्च – | ३,७५० ते ३,९०० |
| ५ मार्च – | ३,७५० ते ३,९०० |
| ७ मार्च – | ३,६५० ते ३,८७५ |
| १० मार्च – | ३,७५० ते ३,९२५ |

३,७०० रुपये क्विंटल भाव मिळाला. ७ मार्चला यामध्ये १०० रुपयांनी वाढ झालेली आहे. प्रत्यक्षात यंदा सोयाबीनचे दर स्थिरावले आहेत. शासनाचा कोणताही प्रक्रिया उद्योग सोयाबीनसाठी नाही. डीओसीच्या दरात कमी आल्याने प्लॉटधारकांकडून सोयाबीनची खरेदी होत नाही.

**काय आहे भावांतर योजना?**

सन २०२३–२४ मधील हंगामात आंतरराष्ट्रीय घडामोडीमुळे कापूस व सोयाबीनचे दरात कमी आली. त्यामुळे शासनाने दोन हेक्टर मर्यादेत हेक्टरी पाच हजारांची मदत कापूस व सोयाबीन पिकांसाठी केली. यंदाच्या हंगामात या दोन्ही पिकांना भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. भावांतर योजनेचा लाभ देण्याची मागणी होत आहे.

# शेतकऱ्यांनी वन्यप्राणी व चोरट्यांपासून बचाव करण्यासाठी शेतजमिनीवरच लावले सीसीटीव्ही कॅमेरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११पोहरा बंदी**

परिसरातील शेतकऱ्यांनी हजारो रुपये खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे आपल्या शेतात लावून घेतले आहेत. त्यामुळे शेतात दररोज नाहक फेरफटका मारण्याऐवजी घरबसल्या संपूर्ण शेतावर नजर रोखण्याची किमया त्यांनी साधली आहे. शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकटांची मालिका सुरू असताना वन्यप्राणी आता शेतकऱ्याची झोप उडवीत आहे. यासाठी ग्रामीण भागातील काही शेतकऱ्यांनी वन्यप्राणी व चोरट्यांपासून बचाव करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेराचा उपयोग



करून शेतात पाळत ठेवणे सुरू केले आहे. हरीण, रोही, चितळ, सांबर रानडुक्कर, माकड यासारखे तृणभक्षी वन्यप्राण्यांचे कळप जंगला लगतच्या शेती परिसरात शिरकाव करीत असल्याने शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या वन्यप्राण्यांपासून शेतकऱ्यांना पीक संरक्षणासाठी जिवाचे रान करावे लागते. मात्र आता ग्रामीण भागातील काही शेतकऱ्यांनी पिकाचे संरक्षण व्हावे व मानवी श्रमही वाचवता यावे या उद्देशाने शेतामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावून घेतले आहेत.

**शेतातही सीसीटीव्ही**

शासकीय व खासगी जागांवर मुख्यत्वाने सीसीटीव्ही कॅमेरे दिसून येतात. मात्र आता याचा फायदा होत असल्याचे निदर्शनात आल्याने शेतकऱ्यांनीदेखील शेतात सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याची शक्कल लढविली आहे. यामुळे मानवाकडून शेतातील शेती अवजारांच्या चोरीवर व वन्यप्राण्यांकडून पिकांच्या होणाऱ्या नासाडीवर काही प्रमाणात अंकुश लागला आहे हे विशेष. यामुळे चोऱ्यांवर नियंत्रण मिळाले आहे.

**रात्रीचा जागल थांबणार**

पोहरा बंदी येथील एका शेतकऱ्याने चार एकर शेती परिसरात चार सीसीटीव्ही कॅमेरे बसून घेतले आहेत. हे चारही कॅमेरे संपूर्ण शेत परिसरावर निगराणी ठेवते. शेती परिसरात कुठल्याही भागात कोणी शिरकाव केल्यास या सीसीटीव्ही कॅमेराच्या साहाय्याने घरबसल्या दिसून येताच शेतमालक शेताकडे धाव घेतो. अशाप्रकारे कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे मोबाइल कनेक्टिव्हिटीच्या साहाय्याने घरबसल्या शेती परिसरातील हालचाली टिपल्या जातात. या प्रयोगाने काही प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा होऊ लागल्याचे चित्र शिवारात दिसून येत आहे.

# आंतरजिल्हा बदलीच्या शिक्षकांना सेवाज्येष्ठता! शिक्षकांची अन्यायकारक धोरण बदलण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

सर्व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना एकच शासन वेतन देत असताना भेदभाव करणे नैसर्गिक न्यायाला अनुसरून नाही. त्यामुळे अशा आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना त्यांच्या मूळ सेवेच्या नियुक्ती तारखेची सेवाज्येष्ठता देण्यात यावी, यामुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर होतील, या अनुषंगाने शासनाने या बदली धोरणात सुधारणा करावी, अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे.

स्वजिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जागा रिक्त वा कमी असल्यामुळे अनेक शिक्षकांना नाइलाजास्तव पोटापाण्यासाठी दुसऱ्या जिल्ह्यामध्ये नोकरी करावी लागते. त्यांना स्वजिल्ह्यामध्ये परत येण्यासाठी आंतरजिल्हा बदली करण्याचा एक मार्ग असतो. तसे शासनाचे धोरण आहे.

**आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांसमोर समस्या**

त्या शिक्षकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ते जिल्ह्यात येण्यापूर्वी एखादा शिक्षक एक दिवस अगोदर या जिल्हा परिषदेला नवीन नियुक्त झाला तर तो सेवाज्येष्ठ ठरतो, त्यांना पदोन्नतीच्या व बदलीच्या संधी असतात. मात्र, त्या शिक्षकांना अनुभव व शैक्षणिक उच्च पात्रता असतानाही या संधी नाकारल्या जातात.

# तपोवन परिसरातील छत्रपती कॉलनीत सहा लाखांची घरफोडी

## सोने, चांदीचे दागिने, रोख लंपास, चार घरातही चोरीचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील तपोवन परिसरातील छत्रपती कॉलनी येथील एका नागरिकाचे घर फोडून सोन्या–चांदीचे दागिने व रोख असा एकूण ६ लाख ९ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. त्याचवेळी या भागातील अन्य चार घरेही फोडण्यात आली. ही घटना रविवारी उघडकीस आली. या प्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील छत्रपती कॉलनी येथील रहिवासी प्रतिक गुरुदेव तायवाडे (३२) हे आई–वडिलांना रेल्वे स्टेशनवर सोडण्याकरिता गेले, त्यानंतर ते तेथूनच ड्युटीवर गेले. या काळात परिसरातील पाच ते सहा घराच्या दाराचे कुलूप तोडून चोरी झाल्याची माहिती प्रतिक तायवाडे यांना त्यांच्या मित्राने दिली. त्यामुळे प्रतिक तायवाडेंनी तातडीने घर गाठले. त्यावेळी त्यांना घराचे गेट व दरवाजा तुटलेला दिसून आला. त्यामुळे त्यांनी घरामध्ये जाऊन पाहणी केली असता चोरट्याने घरातून रोख, सोन्याचे रिंग, ब्रासलेट, मंगळसूत्र, कानातले, बांगड्या, डोरले मनी असलेली सोन्याची पोत असे सुमारे ७०



ग्रॅम सोन्याचे व चांदीचे दागिने असा एकूण ६ लाख ९ हजारांचा ऐवज लंपास केल्याचे त्यांच्या निदर्शनात आले. त्यांनी तातडीने गाडगेनगर पोलिस ठाणे गाठून पोलिसांना चोरीची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी प्रतिक तायवाडेच्या तक्रारीवरून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

# से.फ.ला. हायस्कूलचे कला शिक्षक अजय जिरापुरे राष्ट्रस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ धामणगाव रेल्वे**

ग्लोबल गोल्ड टॅलेन्ट बुक ऑफ रेकॉर्ड, नवी मुंबई यांच्या विद्यमाने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा गुणगौरव करण्यासाठी छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती व ८ मार्च जागतिक महिला दिन निमित्ताने नवी मुंबई येथे पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. या सदर पुरस्कार सोहळ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून ९३० अर्ज प्राप्त झाले होते. त्यामधून फक्त महाराष्ट्रातून ५० पुरस्कारार्थ्यांची यांच्या संस्थेतर्फे निवड करण्यात आली होती.



धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित सेठ फत्तेलाल लाभचंद हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, धामणगाव रेल्वेचे कला शिक्षक अजय जिरापुरे यांची संपूर्ण विदर्भातुन एकमेव कला व शैक्षणिक कार्य या विभागामधून निवड करण्यात आली कला शिक्षक अजय जिरापुरे यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान, ध्येयनिष्ठ, प्रामाणिकपणा, त्यागपूर्ण आणि सकारात्मक असे आणि भावी राष्ट्र निर्माण कार्याला, विद्यार्थ्यांवरील चित्र संस्कार कार्याला अतुलनीय योगदान देत कला शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत असल्याबद्दल तसेच कलेमध्ये दाखवलेली तळमळ आणि कार्यप्रवृत्ती बद्दल त्यांना राष्ट्रस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र रत्न पुरस्कार – २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा ९ मार्चला रविवार रोजी कराडी समाज मंगल कार्यालय, कामोठे,नवी मुंबई येथे प्रमुख अतिथी नयना आपटे पद्मश्री पुरस्कार प्राप्त (भारत सरकार ) जेष्ठ सुप्रसिद्ध अभिनेत्री व नायिका तसेच प्रमुख पाहुणे साक्षी सुबोध नाईक (अभिनेत्री), रत्ना रामस्वरूप खंडेलवाल सहाय्यक पोलीस निरीक्षक (नवी मुंबई), तसेच रामजीत महादेव गुप्ता (मुख्य तपासणी अधिकारी अँटि पायरसी सेल, मुंबई) यांच्या हस्ते कलाशिक्षक अजय जिरापुरे यांना सन्मान चिन्ह, सन्मानपत्र व मेडल देवून पुरस्कृत करण्यात आले.

कला शिक्षक अजय जिरापुरे यांना मिळालेल्या राज्य पुरस्कार बद्दल धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी से.फ.ला. विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत शेंडे, उपप्राचार्य प्रदीप मानकर, पर्यवेक्षक अनिल लाहोटी तसेच विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# जप्तीच्या कारवायानंतरही ७० कोटीच मालमत्ता कर वसुली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

महापालिकेच्या वतीने शहरात यंदा प्रथमच जप्तीच्या कारवाया सुरू करण्यात आल्या तरी १०० कोटीचे वसुलीचे लक्ष्य अजूनही बरेच दूर आहे. ३१ मार्चला २० दिवस शिल्लक असून, या कालावधीत ३० कोटी रुपये वसूल करणे म्हणजे मनपा प्रशासनासाठी तारेवरची कसरत ठरणार आहे.

मागील एक वर्षापासून मनपा प्रशासनाद्वारे सतत अभय योजनांचा भडिमार, वसुली शिबिरे, जप्तीच्या कारवाया सुरू करण्यात आल्या. नेहमीच्या तुलनेत यंदा वसुली ही समाधानकारक असली तरी अजूनही १०० कोटीपर्यंत पोहोचण्यासाठी मनपाला आणखी ३० कोटींची वसुली करावी लागणार आहे.मनपाने ज्या थकीत मालमत्ता धारकांकडे १लाखावर कर शिल्लक आहे, त्यांच्याकडे मोर्चा वळवला असून, सध्या त्यांच्याकडून जास्तीत जास्त कर वसूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. दंडावर १०० टक्के सवलत देऊन झाली. ७५ टक्के सवलतही आयेपली. आता ५० व २५ टक्क्यांची सवलत दंडावर दिली जात आहे. ११ मार्चपासून पुढील १० दिवस दंडावर ५० टक्के सवलत मिळणार आहे. त्यामुळे मालमत्ता कराची वसुली ही आर्थिक वर्षाच्या शेवटी करणे हे मनपासाठी आव्हान आहे.मनपाच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत असल्यामुळे मनपा आयुक्त तथा प्रशासकांनी यंदा प्रथमच मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करून पाचही झोनमध्ये जप्ती पथके गठित करण्याचे निर्देश दिले.

# शहरातील ३०० अनधिकृत मोबाईल टॉवर कडे मनपाचे दुर्लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

मनपा क्षेत्रात ३८३ पैकी केवळ ८३ मोबाइल टॉवर्सच वैध आहेत. मनपा प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे. शहरात विविध इमारतींसह रिकाम्या भूखंडांवर मोबाइल टॉवर उभारलेत. या टॉवरसाठी मनपाच्या बाजार व परवाना विभागाची परवानगी आवश्यक आहे. ज्या इमारतीवर किंवा रिक्त भूखंडावर हे टॉवर उभारतात, त्यांच्या मालकाला कंपन्यांकडून शुल्क दिले जाते. मनपाद्वारे आजवर शहरातील ८३ मोबाइल टॉवरला परवानगी देण्यात आली. त्यांनी रितसर अर्ज करून मनपाकडे शुल्क भरले आहे. परंतु,इतर ३०० टॉकार्स धारकांनी कोणताही अर्ज केला नाही किंवा त्यांनी शुल्कही भरले नाही. त्यांच्यावर मनपा प्रशासनाद्वारे कोणतीही कारवाई झाली नाही. नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत अधिवेशनादरम्यान विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ही माहिती दिली. शहरातील ३०० टॉवर्सला अनुमती देण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने त्यांना वैध म्हणता येणार नाही. १० फेब्रुवारीला मनपा आयुक्तांनी घेतलेल्या आढावा बैठकीत सहायक आयुक्तांना त्यांच्या झोनमधील अनधिकृत मोबाइल टॉवर्स विरोधात कारवाई करण्याचे निर्देश दिलेत.

# फळे,भाज्यांवर शिंपडलेल्या पाण्याचा काय भरवसा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

तापमानाचा पारा वाढला की अनेक ठिकाणी पाणीटंचाईला सुरुवात होते. अशावेळी बाजारामध्ये विकत असलेल्या भाजीपाल्यावर शिंपडले जाणारे पाणी शुद्ध राहील, याची शाश्वती कमी असते. अनेक भाजीपाला विक्रेते मिळेल तेथील पाणी भाजीपाल्यावर शिंपडण्यासाठी वापर करताना दिसतात. त्यामुळे बाजारातून भाजीपाला विक्रेत्याकडून विकत आणलेला भाजीपाला घरी स्वच्छ धुतला जात नसेल तर आरोग्यास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अलीकडे शेतकरी उन्हाळ्याच्या दिवसांत शेतातून कमी वेळात भाज्यांचे जास्त उत्पन्न घेण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करतात, तसेच भाज्यांवर कीटकनाशक फवारणी करतात. यामुळे बाजारातून विकत आणलेला भाजीपाला घरी मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुऊन घेतला पाहिजे. स्वच्छ धुवूनच भाजीपाल्याचा आहारात' वापर करावा, असे तज्ज्ञ सांगतात.उन्हाळ्याच्या दिवसात पालेभाज्या ताज्या ठेण्यासाठी अनेक



विक्रेते मिळेल तेथील पाणी भाज्यांवर शिंपडतात. मात्र, पाण्याची क्षारता न तपासता शिंपडलेल्या पाण्याची शुद्धता ५० टक्केसुद्धा असत नाही.

कीटकनाशकयुक्त भाज्यांचे सेवन केले तर किडनीच्या आजारासह विविध आजार जडतात. किडनीवर परिणाम होऊन मूत्रपिंड, कर्करोग आणि फुप्फुसाचे आजार होतात, असे कोरची येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले. सदर भाजीपाला आहारात न वापरण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

**भाज्या मिठाच्या पाण्याने धुऊन घ्याव्यात का?**

बाजारातून विकत घेऊन आणलेला भाजीपाला घरात मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुऊन घेतला पाहिजे. यामुळे भाज्यांवरील धूळ किंवा भाज्यांवर फवारलेली कीटकनाशके निघून जातात.

**रस्त्याच्या कडेच्या भाज्या धुळीने माखतात**

शहरातील रस्त्यावरून वाहनांची २४ तास सतत वर्दळ सुरू राहते. त्यामुळे रस्त्याकाठी असलेल्या भाजीपाल्यांच्या दुकानांमध्ये भाज्यांवरती धुळीचा थर बसलेला दिसून येतो.

# वीरेंद्र उज्जैनकर यांना कांस्यपदक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे प्रशिक्षक उत्तमचंद ठाकूर व अनिता कुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेणारे वीरेंद्र उज्जैनकर यांनी मुंबई येथे सिव्हिल सर्विसेस तर्फे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ११० मी. व ४०० मी. अडथळ्याची शर्यतमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर चंदिगढ येथे पार पडलेल्या ऑल इंडिया सिव्हील सर्व्हिसेस स्पर्धेमध्ये त्यांनी आपले क्रीडा कौशल्य सिद्ध करीत कांस्यपदक प्राप्त केले.

वीरेंद्र उज्जैनकर हे वन विभागात वनरक्षक या पदावर कार्यरत आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय श्री हव्याप्र मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, प्रशिक्षक उत्तमचंद ठाकूर व अनिता कुन्हे यांच्यासह अपर प्रधान वनरक्षक संजीव गौड, मुख्यवनसंरक्षक जयोती बॅनर्जी, उपवनसंरक्षक दिव्या भारती, अतुल पाटील, जया देशमुख, जया दलाल, हरीश पावडे व आपल्या आई–वडिलांना दिले.

# कापूस विक्रीसाठी घेऊन जाताना शेतकऱ्यावर काळाचा घाला

## भरधाव वाळू डंपरची वाहनाला धडक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११वाठोडा शुक्लेश्वर**

वाळूची अवैध वाहतूक करणारे डंपर जीवावर उठले आहेत. रात्रीच्या अंधारात भरधाव वेगाने डंपर नेले जातात. अशातच अपघात घडत असतात. अशाच प्रकारे कापूस विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या वाहनाला भरधाव वेगाने आलेल्या डंपरने जोरदार धडक दिली. यात गाडीवरील शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना अमरावती जिल्ह्यात घडला आहे.

वाळू घाटांचे लिलाव न झाल्याने अमरावतीत मोठ्या प्रमाणात वाळू तस्करीला उधान आले आहे. वाळू वाहतुकीस बंदी असल्याने रात्रीच्या अंधारात चोरून वाळू वाहतूक केली जात असते. यामुळे डंपर किंवा ट्रॅक्टर भरधाव वेगाने चालविले जात असतात. दरम्यान वाळू वाहतूक रोखण्याचे आव्हान प्रशासनासमोर असताना या वाहतुकीमुळे होणारे अपघात आणि यात अनेकांना जीव गमवावा लागत आहे. अशीच घटना अमरावती जिल्ह्यात घडली आहे.

दरम्यान रात्री झालेला हा अपघात इतका भीषण होता की या अपघातात दोन्ही गाड्या रस्त्याच्या बाजूला उलटल्या आहेत. दरम्यान या अपघातामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रशासनाविषयी रोष व्यक्त केला आहे. रात्री अशा प्रकारे वाळू वाहतूक सुरु असताना अवैध वाळू तस्करी प्रशासनाच्या डोळ्यादेखत सुरू असल्याने या तस्करीला आळा घालण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांचा भाजपमध्ये प्रवेश

## भोयर यांच्या प्रवेशामुळे भाजपचे संघटन वाढणार; चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व अमरावती विभागातील शिक्षक नेते चंद्रशेखर भोयर यांनी आज आपल्या अनेक सहकाऱ्यांसह मुंबई येथील भाजप कार्यालयात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व भाजप नेते माजी मंत्री आमदार संजय कुटे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षामध्ये अधिकृत प्रवेश घेतला. मुंबई स्थित भाजप कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.



भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपचा दुपट्टा देऊन चंद्रशेखर भोयर व त्यांच्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत करीत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की चंद्रशेखर भोयर यांनी गेल्यास निवडणुकीत अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून दुसऱ्या क्रमांकाची मते घेतली होती. पश्चिम विदर्भात त्यांचे मोठे वलय असून त्यांच्या मागे शिक्षकांची एक मोठी फळी उभी आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर कार्य करणारे एक ऊर्जावान कार्यकर्ते आहेत. त्यांच्या या कार्याचा फायदा भारतीय जनता पक्षाला होऊन भाजपचे संघटन वाढण्यास मदत होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. चंद्रशेखर भोयर यांचा पक्षात योग्य तो मानसन्मान राखल्या जाईल अशी ग्वाही देखील बावनकुळे यांनी याप्रसंगी दिली. या पक्षप्रवेश सोहळ्यास माजी मंत्री भाजप नेते संजय कुटे,माजी राज्यमंत्री व अमरावती शहर अध्यक्ष प्रवीण पोटे , अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे, धामणगाव चे आमदार प्रताप अडसड, मेळघाटचे आमदार केवळराम काळे, मोर्शीचे आमदार उमेश यावलकर, तिवसा आमदार राजेश वानखडे ,प्रदेश उपाध्यक्ष अनिल गावंडे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी चंद्रशेखर भोयर यांनी राज्यमंत्री आकाश फुंडकर ,मंत्री जयकुमार रावत, जयकुमार गोरे, नागपूरचे आमदार मोहन मते ,कारंजाच्या आमदार सई डहाके, वाशिमचे आमदार खोडे, अकोल्याचे आमदार रणधीर सावरकर, मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे, काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर, यांच्यासह भाजपचे सर्व ज्येष्ठ नेते ,मंत्री ,आमदार सोबतच अमरावतीचे स्थानिक नेते पदाधिकारी दिनेश सूर्यवंशी, शिवराय कुलकर्णी ,जयंत डेहनकर , तसेच अमरावती शहर व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

**शिक्षण क्षेत्रात भाजपचे संघटन वाढविणार**

भोयर पश्चिम विदर्भातील अमरावती विभागात शिक्षण क्षेत्रात तसेच शिक्षक मतदार संघात भाजपचे संघटन वाढविणे हे आपले मुख्य ध्येय असून जास्तीत जास्त भाजप सदस्यांची नोंदणी करण्यासाठी मोहीम राबविण्याचा निर्धार चंद्रशेखर भोयर यांनी व्यक्त केला आहे.

# सामूहिक शुभमंगल

## २५ हजाराचे अनुदान मिळाले का?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

हल्ली लग्न सोहळा म्हटलं की, खर्चाचा ताण हा पालकांवर पडत असतो. साधेपणाने लग्न करतानाही दोन-चार लाख रुपये खर्च होत असतात. त्यामुळे आता सामूहिक विवाह सोहळे हे फायदेशीर ठरत आहेत. शासनही सामूहिक विवाहाला प्रोत्साहन देत आहे. लग्नसमारंभावर मोठ्या प्रमाणात होणारा खर्च कमी करण्यासाठी आणि अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी 'सामूहिक विवाह सोहळे' आयोजित केले जातात. याअंतर्गत विवाह करणाऱ्या जोडप्याला आता २५ हजार तर आयोजन करणाऱ्या संस्थेला १० हजार रु दिले जातात.शुभमंगल विवाह योजना ही महाराष्ट्र सरकारची एक योजना आहे. या योजनेतंर्गत, सामूहिक विवाह करणाऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. या योजनेची अंमलबजावणी महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून केली जाते.

**अमरावती मध्ये योजना राबविण्यात निरुत्साह**

शासनाने शुभमंगल विवाह योजना लागू केली आहे.जिल्ह्यात अनेक संस्था सुद्धा आहेत तरी अमरावती जिल्ह्यात मात्र सामूहिक विवाह सोहळे आयोजित करण्यात निरुत्साह दिसून येत आहे.

# होळी, रंगपंचमीसाठी बाजारपेठ सजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

होळी, धूलिवंदन सण अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपला आहे.अमरावती शहरातील बाजारपेठेत विविध प्रकारच्या रंगांसोबत शौकिनांसाठी फॅन्सी आयटम्स मोठ्या प्रमाणात विक्रीस आले आहेत. मात्र, यंदा बहुतेक रंगाचे भाव १० ते १५ टक्क्यांनी वाढले आहेत. हर्बल कलर आणि गुलालाला यंदाही मोठी राहणार असल्याचे व्यावसायिक आशिष यांनी सांगितले.



होळीमध्ये विविध रंगांची उधळण करण्यासाठी लहान मुले पिचकारीची आवर्जून मागणी करतात. विविध प्रकारच्या गन स्वरूपातील पिचकारी यंदा बाजारात दाखल झाल्या आहेत. नवीन कलर स्प्रेदेखील बाजारात उपलब्ध असून, त्याची किंमत १००० रुपये इतकी आहे. फ्रुटी हर्बल गुलालदेखील बाजारात आला असून, एका पाकिटाची किंमत ३८० रुपये अशी आहे.

**गाठ्यांच्या विक्रीला वेग**

होळी व रंगपंचमीला साखरेपासून बनविलेल्या गाठ्यांच्या हारांना विशेष मागणी असते. ग्राहकांच्या पसंतीनुसार विविध आकारातील गाठी विक्रीस उपलब्ध असून, लवकरच खरेदीला वेग येणार आहे.

**आकर्षक मुखवटे बाजारात**

विविध प्राण्यांच्या चेहऱ्यांशी मिळतेजुळते तसेच अक्राळविक्राळ मुखवटेही बाजारात उपलब्ध झाले असून, ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. ५० ते १५० रुपये किमतीपर्यंतचे मुखवटे बाजारात उपलब्ध झाले आहेत.

बाजारात गन पिचकारीची किंमत ३० रुपयांपासून ते १५०० रुपयांपर्यंत आहे. रंग उधळण्यासाठी स्पायडर मॅन, छोटा भीम, मोटू पतलू, मिकीमाऊस, अँग्री बर्ड, डिझनी वर्ल्ड, कॅप्टन अमेरिका, फ्रोजन, मुलींसाठी बार्बी प्रिंटवाली पिचकारी उपलब्ध आहेत. रंगासह अन्यं साहित्यही बाजारात उपलब्ध असून, त्यांची खरेदीही सुरू आहे.

**पर्यावरणपूरक रंगांना ग्राहकांची पसंती**

पर्यावरणपूरक रंगांना ग्राहकांकडून मागणी आहे. रंगपंचमीच्या वस्तू नागपूर शहरातून विक्रीसाठी आणण्यात येत आहेत. कच्च्या मालाच्या किमतीमध्ये वाढ झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे. मॅजिक ग्लासला बालगोपाळांची ३ विशेष पसंती आहे. मात्र, यंदा चिनी उत्पादन बाजारात आलेले नाही, मात्र गतवर्षातील काही माल शिल्लक आहे.

# धामणगाव कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये महिला राज

## महिला सक्षमीकरणासाठी माजी आमदार प्रा.वीरेंद्र जगताप यांचा पुढाकार : उपसभापतीपदी संगीता गाडे यांची अविरोध निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११धा.रेल्वे**

येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापती कविता गावंडे ह्या असून उपसभापतीपदी मंगळवारला (ता.११) गव्हा फरकाडे येथील सेवा सहकारी संस्थेच्या माजी अध्यक्ष व बाजार समितीच्या संचालिका संगीता संजय गाडे यांची अविरोध निवड झाली.याबद्दल त्यांचे माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप व आदींनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.दरम्यान नुकताच महिला दिन साजरा झाला.आता येथील बाजार समितीच्या सभापती व उपसभापती महिला झाल्या असून खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचे ज्वलंत उदाहरण पहावयास मिळाले.महिला सक्षमीकरणासाठी माजी आमदार प्रा.वीरेंद्र जगताप यांनी पुढाकार घेतला आहे.



> संगीता गाडे यांचे सासरे स्व. मारोतराव गाडे हे सुद्धा या बाजार समितीचे संचालक होते. आमचे नेते विरेंद्र जगताप यांनी व सर्व संचालकानी माझ्यावर विश्वास दाखविला त्या बद्दल त्यांचे तसेच ज्या मतदारांनी मला संचालक म्हणून निवडून दिले त्यांचे सुद्धा आभार व्यक्त करते. शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहील.
>
> **संगीता गाडे, उपसभापती,**
> **कृषी उत्पन्न बाजार समिती धामणगाव रेल्वे**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मंगेश बोबडे यांनी उपसभापती पदाचा राजीनामा दिला होता.दरम्यान बाजार समितीच्या उपसभापती पदाची निवडणूक पार पडली.यात गव्हा फरकाडे येथील सेवा सहकारी संस्थेच्या माजी अध्यक्ष व बाजार समितीच्या संचालिका संगीता संजय गाडे यांची अविरोध निवड करण्यात आली.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक गजानन डावरे,सहकार अधिकारी सरिता गोडबले उपस्थित होते. यावेळी बाजार समितीच्या सभापती कविता गावंडे,माजी उपसभापती व संचालक मंगेश बोबडे, मुंकिंदा माहोरे,गिरीश भुतडा,भाऊराव बमनोटे,चंदा निस्ताने, मेघा सबाने, राधेश्याम चांडक,रवि भुतडा, विलास भिल,विपीन ठाकरे,संदीप दावेदार, चंदू ठाकरे,प्रशांत हुडे, दिनेश जगताप,प्रमोद रोंघे,सचिन सोमोसे व आदी उपस्थित होते.संगीता गाडे त्यांचे माजी आमदार वीरेंद्र जगताप,जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे,जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व शिक्षण सभापती सुरेश निमकर,माजी जिल्हा परिषद सदस्य मोहन पाटील,तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज वानखडे,पंचायत समितीचे माजी उपसभापती नितीन दगडकर,खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बबनराव मांडवगणे,उपाध्यक्ष प्रदीप मुंदडा, दत्तापुर सेवा सहकारी संस्थेचे संचालक नितीन कनोजिया,वैभव पावडे व आदींनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आषाढी यात्रेपूर्वी टोकन दर्शन; भाविकांसाठी ऑनलाईन दर्शन रांग राहणार सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११पंढरपूर**

पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन संवर्धनपनाचे काम करण्यात येत आहे. आगामी येणाऱ्या आषाढी यात्रेपूर्वी सर्व काम पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच भाविकांच्या सोयीसाठी टोकन दर्शन सुविधा देखील आषाढी यात्रेपूर्वी सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आषाढी व कार्तिकी यात्रेला विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक पंढरपूरमध्ये येत असतात. यामुळे पंढरपूरमध्ये भाविकांची मांदियाळी पाहण्यास मिळत असते. या गर्दीचे नियोजन करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न सुरु आहे. तर पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे काम देखील सुरु आहे. या कामाला देखील गती देत आषाढी यात्रेपूर्वी करण्यात येणार असल्याचे गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.



टोकन दर्शन सुरू करण्यासाठीची संगणक प्रणाली तयार झाली आहे. लवकरच सुरक्षेच्या दृष्टीने टोकन दर्शनाचा आढावा घेतला जाणार आहे. त्यानंतर आषाढी यात्रेत टोकन दर्शन सुरू होणार आहे. टोकन दर्शन सुरू झाले तरी सामान्य भाविकांचे दर्शन रांग आणि ऑनलाइन दर्शन रांग देखील सुरू ठेवण्याचा निर्णय आज झालेल्या मंदिर समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

दर्शन मंडप आणि स्काय वॉकच्या कामासाठी १३० कोटी रुपये राज्य सरकारने मंजूर केले होते. या कामाचे फक्त टेंडर रद्द झाले आहे. सरकारने दिलेला निधी रद्द झाला नाही. त्यामुळे राज्य सरकार विठ्ठल भक्तांना टोकन दर्शन देण्यासाठी बांधील असल्याचा दावा समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केला आहे.

# आरटीई'चे मुदतीत १५२२ प्रवेश निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती जिल्ह्यात आरटीई अंतर्गत सोमवारी शेवटच्या दिवशी १ हजार ५२२ बालकांचे प्रवेश निश्चित झाले असून अद्यापही ८४७ बालकांचे प्रवेश शिल्लक आहे. शासनाकडून या या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली नाही. त्यामुळे आता प्रतीक्षा यादीतील पालकांना संधी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.आरटीईत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता जिल्ह्यात २२५ शाळांमध्ये २ हजार ४३० जागांकरिता राबविली जातआहे. याअंतर्गत लॉटरीमध्ये नशिबवान ठरलेल्या २ हजार ३९६ पाल्यांच्या प्रवेशाकरिता १४ ते २८ फेब्रुवारी पर्यंतची मुदत शासनाकडून प्रवेशाकरिता देण्यात आली होती. या दरम्यान २ हजार ३९६ पैकी केवळ १ हजार ३२३ पाल्यांचेच प्रवेश निश्चित झाले होते तर १०७३ पाल्यांचे प्रवेश शिल्लक होते. याकरिता शासनाकडून याला १० दिवसांची म्हणजे १० मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या मुदतवाढीत ४४९ प्रवेशात भर पडली. त्यामुळे शेवटच्या दिवशी सोमवारपर्यंत १ हजार ५२२ प्रवेश निश्चित झाले होते. अद्यापही ८४७ प्रवेश शिल्लक आहेत. परंतु शासनाकडून मुदतवाढीचे आदेश प्राप्त झाले नाही.

# 'शादी में जरूर आना...'; फसवणुकीचा नवा फंडा


## मोबाइलवर लग्नपत्रिकेद्वारे आमंत्रण : APK फाइल डाउनलोड न करण्याचे आवाहन

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

सध्या लग्नसराईचे दिवस असून, सोशल मीडियावरूनच निमंत्रण पत्रिका देण्यात येते. कमी वेळ आणि कमी खर्चात आकर्षक लग्नपत्रिका या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे शक्य होते. नेमका याचाच गैरफायदा घेत सायबर भामट्यांकडून व्हॉट्सअ‍ॅपवरून लग्नपत्रिका पाठवून फसविण्याचा नवीन फंडा अवलंबला जात आहे. 'शादी में जरूर आना..' असा संदेश आणि त्यासोबत 'एपीके फाइल' शेअर केली जात आहे.

लग्नसराईची धामधूम असल्याने आपल्या मित्र आणि नातेवाइकांपर्यंत पत्रिका पोहोचविण्यासाठी सोशल मीडियाचा वापर वाढला आहे. यात पीडीएफ फाइल, फोटो



इमेज यासह जीआयएफ फाइल, व्हिडीओ किंवा डिजिटल स्वरूपातील लग्नपत्रिका व्हॉट्सअ‍ॅपवरून शेअर केली जाते. ही लग्नपत्रिका अनेकजण डाउनलोड करतात. आपल्या नातेवाइक किंवा परिचितांकडे विवाहसोहळा असल्याने त्याबाबत उत्सुकताही असते. ही बाब हेरून सायबर गुन्हेगारांकडून लग्नपत्रिका पाठवल्याचे भासवून व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पाठविण्यात येणाऱ्या 'मेसेज'मध्ये एक एपीके फाइल पाठविली जात आहे. ही एपीके फाइल डाउनलोड करून इन्स्टॉल केल्यानंतर मोबाइलमधील डेटा, बँक खात्याची माहिती, पासवर्ड अशा स्वरूपाची माहिती मिळवून बँक खात्यातून पैसे काढून फसवणूक केल्याचे प्रकार घडत आहेत.

त्यामुळे अशी एपीके फाइल डाउनलोड करू नका, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

> सोशल मीडियावरील कोणत्याही बनावट तसेच फसवणूक होईल, अशा मेसेजला नागरिकांनी प्रतिसाद देऊ नये. असा मेसेज, त्यातील फोटो, फाइल, लिंक, माहिती शेअर करू नये. तसेच एपीके फाइल डाउनलोड करू नये. तसा संदेश आल्यास स्थानिक पोलिस ठाणे किंवा सायबर पोलिसांशी संपर्क साधावा.
>
> **सायबर सेल (अमरावती)**